नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

एप्रिल १९६०

युगवाणी

संपादक: पु. य. देशपांडे

विदर्भ साहित्य संघ
विदर्भ सारस्वती जन्मभूः

ल लेखक व कवि

त
देशपांडे
र कोरेकर
किनी सहस्रबुद्धे
नन्द
. ग. सहस्रबुद्धे
द्ध
ा. वर्णेकर
ीशंकर पंडित

मूल्य ८ आणे

अनुक्रमणिका

(मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयांकरिता मान्य झालेलें)

युगवाणी

एप्रिल १९६०

संपादक-मंडळ
संपादक पु. य. देशपांडे
सदस्य गो. रा. दोडके
प्र. वा. ऊर्ध्वरेषे
पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

* *

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
संपादक :
पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

युगवाणी

वर्ष १५ [अंक १

कला : जीवन : समीक्षा
एप्रिल १९६०

क वि ता

विज्ञप्ति

यशवन्त

आपुलिया बळे नाही बोलवत
सखा भगवंत वाचा त्याची
तोच भगवंत तुमचिया पोटी
ओठी दिठी हाती तुडुंबला

मुख कुर्वाळूनी प्रेमे भरविता
झाला गोंजारिता मजलागी
वठल्या वृक्षास फुटावी पालवी
आटली लागावी वाहू नवी

अशीच आपुल्या स्पर्शाची थोरवी
संसार वैभवी मोहरावा
अहो सान थोर भगवंत-मूर्ति !
फिरून विज्ञप्ति म्हणून ही

आपुल्या कृपेचे हेच निरंतर
छत्र मजवर असो द्यावे
व्हाया उतराई तेणे यावे बळ
संकल्प सफळ व्हाया तेवि

अनुक्रमणिका

देव कुठे ? देव कुठे ?

पु. य. देशपांडे

" देव कुठे ? देव कुठे ?
आभाळाच्या आरपार "
इवल्याशा या जीवाला
थांग कसा लागणार ? ॥१॥

इथे आहे, तिथे आहे,
पिशापरी मी हिंडतो
नाही सापडत कोठे,
घोर माझा रे खचतो ॥२॥

इवलासा जीव दिला
स्वतः असता अपार
पारावर नाही ऊण—
असा कसा व्यवहार ? ॥३॥

ओढ लावूनी जीवाला
गेला अभाळाच्या पार,
ओढ आंधळी, पांगळी
तिला कशाचा आधार ? ॥४॥

ओढ कशाला लाविली
मनी नव्हते भेटणे ?
जाळ कशाला हा केला
मनी नव्हते शेकणे ? ॥५॥

जाळ जाळितो हा मला
जणू पेटले सरण
देह भस्म होतो तरी
नाही येत रे मरण ॥६॥

असा कसा रे हा जाळ
सर्व वृक्षांना जाळितो
विश्व करुनी उजाड
तुझ्याकडेच ओढितो ॥७॥

सर्व सर्व झाले भस्म
आता उरले न काही
तुझी ओढ, तुझी स्मृति
तरी रेंगाळत राही ॥८॥

तुझ्या ओढीत, स्मृतीत
विश्व सर्व हे आटले
तुझ्या दर्शनाच्या पायी
माझे भानहि लोपले ॥९॥

माझ्या अभानाच्या गावी
तुझ्या मायेचे माहेर
माझें सर्व तुझें होतां
तुझ्या सर्गाला बहर ॥१०॥

माझ्या उत्कंठेच्या पोटी
जन्मा आले हे वैकुंठ—
सारे, सारे उमगले
परी दाटतो हा कंठ ॥११॥

* *

काय लिहू मी ?....

प्रभाकर कोरेकर

(अंतरातील भावकल्पनांनी रंगविलेलं चित्र जीवनाच्या कागदावर कर्तृत्वाच्या कुंचलीने रेखाटण्याचा फार प्रयत्न करतो; पण ते वास्तवतेत रेखाटलं जात नाही. म्हणून जीवनातील अमूर्त शक्तीला आवाहन—)

काय लिहू मी ?—की कोऱ्यावर—
नुसते काळे करीत जाऊ ?
रक्ताच्या थेंबार्थेंबावर,
शब्द-मुलामा चढवित जाऊ ?
काय लिहू मी ?········· ॥१॥

अमूर्तातल्या मूर्त कल्पना,
अंधारी मी कुठवर ठेवू ?
अंतरातल्या शुष्क भावना,
हृदय कपारी कुठवर ठेवू ?
काय लिहू मी ?......... ॥२॥

भाव स्फुरे परि शब्द सुचेना.
भावसंगती कैशी जुळवू ?
स्वप्न स्मरे परि चित्र जमेना,
व्यर्थ कुंचली कैशी फिरवू ?
काय लिहू मी ?......... ॥३॥

कुठे 'शब्द' ते जीव व्याकुळे
शब्दांना मी कैसा शोधू ?
'कवी' नव्हे मी केवळ मानव
भावसृष्टिला कैसा सजवू ?
काय लिहू मी ?......... ॥४॥

दिव्योर्मीच्या उष्ण खुणांनी,
जळते जाणीव, कुठवर साहू ?
नयनाश्रूंच्या कणाकणांनी,
भिजतो 'कागद' कुठवर पाहू ?
काय लिहू मी ?......... ॥५॥

★ ★

अनुक्रमणिका

दर्शनाची आस

कु. मंदाकिनी सहस्त्रबुद्धे

दर्शनाची आस । उचले पाऊल
वासनेचा घोळ । लडबडे ॥१॥

ओढीच्या हाताने । सावरून घोळ
पडेल पाऊल । पुढे पुढे ॥२॥

नाही जाईजुई । नाही चाफा सोन
ओंजळ भरून । भाव-फुले ॥३॥

सुगंध नामाचा । येई भाव-फुला
आवडावा तुला । आस माझी ॥४॥

तुझ्या पूर्णत्वाच्या । जाणिवेचा धूप
भरला अमाप । पूजास्थानी ॥५॥

ओवाळण्या आहे । तेजाळली ज्योत
बिंब नयनात । पडे तुझे ॥६॥

किंचित स्मरण । नैवेद्य दुधाचा
रस जीवनाचा । अर्पिते मी ॥७॥

भजनाची इच्छा । कुठे तरी खोल
तोच हो तांबूल । मुखवास ॥८॥

अनन्य शरण । होवो माझे मन
दक्षिणेचे धन । विड्यावरी ॥९॥

घडो माझ्या मुखे । तुझे गुणगान
जीव ओवाळून । आरती ही ॥१०॥

अपुरे पूजन । मागणे ते पण
दिन प्रतिदिन । वाढतसे ॥११॥

केले हे पूजन । ना जरी निष्काम
तरी समाधान । अंतरी या ॥१२॥

माझ्या जीवनाचा । आई मध्यबिंदु
हो ग कृपासिंधु । हट्ट माझा ॥१३॥

तुझ्यावर प्रीत । मर्यादेची रेघ
वर्तुळ सुरेख । जीवनाचे ॥१४॥

भवती तुझ्यावर । पूर्णब्रह्म अन्न
उदरभरण । होवो माझे ॥१५॥

तुझ्यावर श्रद्धा । सवाईने देई
वस्त्र मला आई । नेसावया ॥१६॥

तुझ्याच इच्छेने । तुझ्या मदतीने
ध्येय ते गाठणे । जीवनाचे ॥१७॥

तुझा आशीर्वाद । हेच माझे बळ
निश्चये नेईल । तुझ्या गावी ॥१८॥

★ ★

ध्यास

कुसुमानंद

गतस्मृतीचे पाखरू
सोलते मनाची साल
प्राणाच्या जखमेतूनि
आज वाहे दुःख लाल

अर्थ आहे भावनेला
आणि माझ्या वेदनेला
भूतकाळ काळा काळा
रक्तरंग आला त्याला

卐

अनुक्रमणिका

विदर्भातील एक सिद्धहस्त काव्यकथाकार

श्री. वा. ना. देशपांडे

ले० प्रा. प्र. ग. सहस्रबुद्धे,
एम्. ए., एलएल बी.

श्री. वा. ना. देशपांडे यांचे नांव डोळयासमोर येताच साहित्यविषयक विविध प्रकारचे स्फुट टीकालेखन आठवतें; मुक्त-छंद, थोडासा गूढवाद, नाटय-काव्य आणि नभोनाटचे, छंदविषयक नवनवीन प्रयोग, या सर्वांची आठवण होते. पण वा. ना. देशपांडे यांच्या प्रतिभेने अगदी वैशिष्टचपूर्ण आणि फार यशस्वी अशी चमक जर कोठे दाखविली असेल तर ती काव्यकथांच्या रचनेतच दाखविली आहे. कोरकू या त्यांच्या वैशिटचपूर्ण काव्यांत कोरकू या रानटी जातीचा त्यांनी अल्प परिचय तर करून दिलाच आहे, पण त्यांची एक साधी सुंदर कथाहि सांगितली आहे. 'आराधना' व 'अनामिका' या त्यांच्या काव्यसंग्रहात एकंदर दहा कथाकाव्ये आहेत. 'आराधने' मध्ये, भारती, पूजिका, सोहागरात व देवमान्य अशी चार कथाकाव्ये आहेत. 'अनामिका'मध्ये संजीवन, पतिता, गडावरील पुनव, तरलेले वेद, क्षमा आणि अमृतकुंभ, अशी सहा कथाकाव्ये आली आहेत. या कथाकाव्यात विविध विषय आले आहेत. प्राचीन ऐतिहासिक विषयापासून काही अद्यावत् तरल विषयापर्यंत या कथाकाव्यांचा संचार झाला आहे. देशपांडे यांची भाषा साधी, सोपी व ओघवती आहे. अशी भाषा कथात्मक काव्याला फारच अनुकूल असते. कथाकाव्यासाठी त्यांनी योजिलेली वृत्तेहि धावती व साधी असतात. संयम हा यांचा फोर मोठा गुण आहे. नव्या उपमा शोधण्याचा किंवा नव्या कल्पना मांडण्याचा त्यांना हव्यास असला तरी त्याच्या नादी लागून कथासूत्र सोडून ते इकडे तिकडे भटकत नाहीत. पाल्हाळ किंवा विषयांतर त्यांच्या कथाकाव्यात कोठेच आढळत नाही. भावोत्कट प्रसंग, रमणीय कल्पकता, बांधेसूद रेखीव, टापटीपेची रचना—हे त्यांच्या कथाकाव्याचे चटकन लक्षात येणारे गुणविशेष आहेत.

'भारती'

'भारती' हे त्यांचें कथाकाव्य रूपकात्मक आहे. काव्यदेवता शब्दजोडचा-घीटपाठ कवीवर प्रसन्न होत नसते. भावसरोवर क्षुब्ध करून टाकणाऱ्या आणि रसांची रंगत फुलविणाऱ्या रससिद्ध कवींनाच ती लाभते. असा या कवितेचा आशय आहे. काव्यदेवता भारतीचें वर्णन पुढीलप्रमाणे आहे.--

" वाल्मीकीच्या सुयशासम ती धवलांगी गोजिरी,
कोमलगात्री जयदेवाची जैशी वर्णावली
कविकुल-गुरूच्या कल्पनेपरी चारु मदनमंजिरी
अलंकारमंडिता ज्यापरी प्रथिता कादंबरी."

काव्यशक्तीच्या अद्‌भुत प्रभावाचा कोणाला परिचय नाही ? येथे स्वतः काव्यदेवताच म्हणत आहे.--

सिकतेवरिही, जेथे माझे पदपंकज उमटते
वसंत लक्ष्मी स्वये प्रगटुनि त्या स्थानी लोळते
क्षुद्र कुरवका हातुहि माझा ओझरता लागता
सवेचि त्या ये कल्पतरूचे रूपसाम्य तत्वता !

या काव्यदेवता भारतीला प्राप्त करण्याची अभिलाषा धरणारा गणदास एक भिल्लकुमार असून तो वर्णानें काळाकभिन्न आहे. त्याच्या कृष्णवर्णाची महती त्याच्याच मुखानें सांगताना सहजच नर्म विनोद साधला आहे. तो म्हणतो–

" वाजवितो मी मृदंग तेव्हा दिसतो मेघापरी
मजसन्मुख मग मुदे नाचते श्रमे मोरमंडळी "

सहज बोलून समजावून ही पीडा कांही टळणार नाही, हे भारतीच्या लक्षात आलेले असते. आपल्या मैत्रीणीसमवेत ती त्याच्या भोवती फेर धरून नाचते आणि दिव्य गानमोहिनीने तो मूर्च्छित झाल्यावर त्याला सोडून कायमची निघून जाते. वेडा बिचारा गणदास--

" तेव्हापासुन पिशापरी तो गहन तुडवि निजपदी
भारती ! भारती ! '-साद तयाची गिरि कुहरे घुमविती

या कथाकाव्यातील रूपक वा. ना. देशपांडे यांच्या श्रेष्ठ कल्पकतेचा परिचय घडविते. तसेच ते कवीची श्रेष्ठ अभिरुचीहि दर्शविते. रससिद्ध कवींचा गौरव आणि शब्दजोडचा घीटपाठ कवींचा धिक्कार हाहि यात अभिप्रेत आहे. कथेवर रूपक कसे अगदी चपलख बसले आहे. कृत्रिम ओढाताणीचा प्रकार कोठेहि केलेला नाही.

'पूजिका' व 'सोहागरात'

'पूजिका' या कथेत एक खोचक उपरोध आहे. चोर खातो तूपरोटी, आणि सज्जनाच्या हातात नरोटी, असा प्रकार या जगात आपणास अनेक वेळा आढळतो. हीच विचित्र जगराहटी पूजिकेत वर्णिली आहे.

निवांतपणे पूजा करावयाला मिळावी म्हणून रात्री सगळ्यात शेवटी पूजिका मंदिरात खऱ्या भक्तिभावाने येते. पण पाहाते तो, देवाची मूर्तीच चोरीस गेलेली. अतिशय निराश होऊन देवाच्या आणि दैवाच्या या विचित्र लीलेबद्दल ती म्हणते--

"तुज पळविती तया लाभला किरीट
निर्माल्यही तुझे माझ्या नाहीना दैवात ?"

या लहानशा कथेत पूजिकेची आर्तता, मंदिरातला कोलाहल आणि शेवटी पूजिकेची निराशा यांचे चित्रण फार सुंदर वठले आहे. त्यातील व्यंग मर्मभेदक आहे.

'सोहागरात' हे ऐतिहासिक कथाकाव्य अधिक हृदयंगम आहे. गनोर यथील राणी गौरीच्या अभिलाषेने, पठाण दाउदखान याने तिच्या पतीला कपटाने ठार मारले. त्यानंतर खानाने मीलनाची निकड लाविली असता तिने लटकी अनुकूलता दाखवून पतीच्या कपटवधाचा सूड कपटवधानेच उगविला. शेवटी स्वतःचेहि बलीदान देऊन पतीच्या भेटीसाठी निघून गेली.

गौरीला पत्र पाठविल्यानंतर तिच्याकडून अनुकूल उत्तराबरोबरच पोषाख वगैरे नजराणाहि आल्यामुळे हर्षित झालेला दाउदखान रात्रीची वाट पाहत आहे. संध्याकाळ झाली आहे. हे पाहा त्या संध्येचे चित्र--

"संध्येची मधु लाली लागे तमि मिसळाया
घडिभर रांगे विश्वावरती पिंगट छाया
अवकाशाच्या विळाभीतरी रजनी सर्पिण
घूसर घूसर कातच वाटे देई टाकून."

त्या आतुर दाउदखानाने स्वतःची छबी पहा कशी सजविली आहे--

"विलसे त्याच्या शिरी भरजरी टोप तुऱ्याचा
करकरणारा चढाव पायी वेल-बुटीचा !
सुरमा रेखी नयनि सळइने कोरुन कोरुन
तांबुस दाढी दुभंग आपुली करी विंचरुन"

अनुक्रमणिका

असा सगळा साज शृंगार करून दाउतखान तातडीने निघाला--

" टाच मारिता ठुमकत ठुमकत अश्व निघाला
प्रासादाच्या द्वारापाशी क्षणी ठेपला "

गौरी अतिशय सुंदर होती —

" शहामृगाच्या कोशासम तनु निस्तुल गोरी
केश सुगंधित काळे काळे जशी कस्तुरी
चुनडि केशरी खुले केशरी तशीच चोळी "

आणि आता पुढल्या एकाच ओळीत गौरीच्या मनःस्थितीचा कसा वृहत् परिचय कवीने दिला आहे पहा. केशरी बाण्याला राजस्थानात एक विशिष्ट अर्थ आहे. त्याच अर्थाने गौरीने केशरी वस्त्रे परिधान केली होती. म्हणूनच कवि म्हणतो—

" यज्ञवेदिते अनलज्वाला की लपेटली !"

गौरीने दाउतखानच्या स्वागतार्थ मोठी तयारी केली होती. नृत्यगायनाचे आयोजन केले होते. उत्तम मद्याची व्यवस्था होती.

" करू लागल्या रम्य नर्तकी गायन नर्तन
सारंगीच्या सुरात आपुला सूर मेळवुन,
धिकि धिकि शब्दे मृदंग धरितो ताल सारखा
ठेक्यावरती पाय तयांचा पडे नेटका
मणिमय वेणी जललहरीपरिस नाचनाचते
पाठीस लागे जणू त्यांचिया मोहुनी त्याते "

खान त्या संगीतात रंगून गेला. मद्याचे पेल्यावर पेले रिकामे झाले. गौरीने पाठविलेला आणि त्याने अंगात घातलेला भरजरी पोषाख विषाने माखलेला होता हे त्या मूर्खाला उमगले नाही. विष अंगात भिनण्याची गौरी वाट पहात होती. कोणत्या ना कोणत्या उपायाने ती वेळ घालवीत होती. अंतःकरणात क्रोध पेटला आहे. चेहऱ्यावर मात्र प्रसन्नता दाखविली जात आहे. ही सर्व परिस्थिति कवीने अगदी थोडक्यात पण बहारीने वर्णन केली आहे—

" पट पट बदलति भाव गौरिच्या वदनावरचे
—रंग बदलती जैसे स्वाती-नक्षत्रीचे !
आणि तन्मुखी झुंज चालली अटीतटीची
वळेच आल्या स्मितासंगती संतापाची !"

पुढे आपल्या हाताने गौरीने मद्याचा पेला भरून दिला आणि तिने त्याला नृत्यगायनात गुंगविले.

अनुक्रमणिका

"पुन्हा नर्तकी घेउ लागल्या तान सुघोपम,
चाळ चरणिचे वाजती पुन्हा रुमझुम–रुमझुम !
× × ×
तोंच कोसळे दाउद । विटपच जणु उन्मळला ।
गडबड–गडवड भुइवर लागे लोळायाला ! "

विष भिनले, अंगाचा दहा होऊ लागला. दाऊद धरणीवर कोसळला. गौरीने सांगितले की मी हा माझ्या पतीच्या निधनाचा सूड उगवला आहे.

" निमिषोन्मेषी दाउदावरी चालून गेली
उरी तयाच्या चकचकणारी कटचार घाली "

मग त्या सगळ्या स्त्रिया दारूच्या कोठाराकडे वळल्या. त्याला आग लावून त्यांनी त्यात स्वदेहाचा होम केला.

या कथेत, ऐतिहासिक कथात आवश्यक असलेला भरदारपणा नाही, असा काही टीकाकारांचा आक्षेप आहे. परंतु तसा मुळी या कथेचा विषयच नाही. या कथेचा विषय आहे रजपूतरमणीच्या पातिव्रत्याचा. धारदारपणा तो कवीने उत्कृष्ट रंगविला आहे. फापट पसारा न वाढवितां नेमके प्रसंग मोजक्या शब्दात चित्रित केले आहेत.

'देवमान्य'

'देवमान्य' ही लहानशी कथा तर नितांत सुंदर आहे. शंभर यज्ञ करणाऱ्या एका राजाने शंभरावा यज्ञ झाल्यानंतर यज्ञनारायणाची एक सुंदर मूर्ति बनवली आणि मोठ्या थाटामाटाची मिरवणूक काढली. दर्शनेच्छूंची गर्दी जमली. स्तुति-सुमनांचा वर्षाव झाला. अहंकारी राजा विचार करीत होता, एवढें मोठे कर्तृत्व मी केलें, पण अजून स्वर्गातून पुष्पवृष्टि का वरें होत नाही ?

तितक्यात एक कुष्ठरोगी यज्ञनारायणाच्या पालखीजवळ जाऊ लागला. त्या अमंगळाचा यज्ञनारायणाला विटाळ नको म्हणून सैनिक नागव्या तरवारी घेऊन धावले. ते पाहून एक श्रमण पुढे आला. त्याने त्या गलितांगाचे शरीर आपल्या देहाने झाकले. श्रमणाच्या देहाचे तुकडे तुकडे झाले. त्याच्या या आत्मयज्ञावर स्वर्गातून फुले उधळली गेली.

तो कुष्टी म्हणजे साक्षात् यज्ञनारायण रोता. तो प्रगट होऊन राजाला म्हणाला--

" रंजल्या गांजल्या दीनांचे शरीर
आम्हा देवतांचे हेच रे मंदीर !
मीच झालो कुष्टो सत्व पाहण्याला—
भिक्षूवींण तये कुणीच कसाला !

पहा ! कैसा मान्य हो देवालागून--
स्वर्गातून तया येतसे विमान ! "

'देवमान्य'ची ही लहानशी कथा नितांतसुंदर झाली आहे.

संजीवन शीर्षकाने युक्त फुटकळ भावगीतांच्या समूहास कथासूत्र आहे असें मानल्यास ते निमित्तालाच घेतल्यासारखे वाटते. तथापि प्रेमविषयक एक मोठा नाजुक प्रश्न हळुवारपणे व विस्ताराने, या काव्यात मांडला आहे. निरपेक्ष उदात्त प्रेमहि शेवटी शारीरिक सहवास आणि स्वामित्व मागतेच. नायकाची हताश स्थिति, नायिकेची ध्येयवादिता, यांची विविध दर्शने या काव्यांत कवीने घडविली आहेत.

"चिरंतन सौंदर्या ! रे
छंद तुझा घेई मन,
वस्तुगत सौंदर्यात
तुझे घडू दे दर्शन ! "

असा ज्याला ध्यास लागलेला आहे आणि

"म्हणूनच मानतो मी सौंदर्यधर्म:
निरामय आनंद हे तयाचे मर्म ! "

अशी ज्याची धारणा आहे, असा हा नायक नेहमी सौंदर्यपूजेत मग्न आहे.

"—ध्यान तुझे हे परम मनोरम आठवतो,
मानसपूजनि तुझ्या अहर्निश मी रमतो
स्पर्श मम मना सौंदर्याचा तव व्हावा,
प्रसाद मजला हाच देवते ! तू द्यावा ! "

अशा रीतीने सौंदर्य आणि प्रेम यांच्या विविध मनोज्ञ छटा या काव्यात प्रगट झाल्या आहेत. सौंदर्याचे तत्वज्ञान हा या काव्याचा विषय आहे. प्रेमाचे तत्वज्ञान त्यात अनुषंगाने आले आहे. तत्वज्ञान हा शब्द वापरला म्हणून त्यात रुक्षता आहे असे मात्र कोणी समजू नये. या काव्याची एकंदर रचना फारच रेखीव, ललित आणि हृदयंगम झाली आहे.

"भेट आपुली जेव्हा झाली सखये ! पहिली वहिली ग,
आपाद तुझी मूर्ती तेव्हा परिचित मजला गमली ग ! "

अशा अगदी सहज सोप्या आणि मनाची पकड घेणाऱ्या किती तरी पंक्ति या काव्यात जागोजाग विखुरल्या आहेत. आणि शेवटी म्हटले आहे—

कशाला रडगाणे रे असले ?
न हे जहाले, न ते जहालें—कुरकुरणे तरि कसले ?
× × ×
घे मिळतो तो रस जीवनिचा--कुणी पाहिले पुढले ?

'पतिता'

'पतिता'मध्ये--बायबलमधील एक कथा वर्णिली आहे--

" पापाचा वाराहि न जया ठावा
तेणेच पाषाण हिला मारावा ! "

अशी ख्रिस्ताची रोकठोक वाणी ऐकताच त्या गर्दीतल्या सगळ्यांची मने अंतर्मुख झाली. अगदी थोडक्यात, हा प्रसंग 'पतिता'मध्ये उभा केला आहे; तर 'क्षमा'मध्ये महंमद पैगंबराने 'कुरेश' जातीवर स्वारी करून, सूड न उगविता क्षमा केली तो प्रसंग वर्णिला आहे. "गडावरील पुनव'मध्ये मांडवगडच्या रूपमती–बाजबहादुर यांची कथा आली आहे.--

" कर्तव्याते उपेक्षिले कटु फल तया आले
रणांगणी उडे पुरी दैना !
मुशाफिरा ! ही कहाणी सांग जनी तू जाउनी
कर्तव्याचा दे तया संदेश

असा आपल्या जीवनाचा निष्कर्ष रूपमतीने सांगितला आहे.

'तरलेले वेद' यामध्ये रामेश्वरभट्टांनी तुकारामाच्या गाथा इंद्रायणी नदीत नेऊन बुडविल्यावर त्या पुनः कशा वर आल्या तो अद्‌भुत प्रसंग वर्णिला आहे.

" तुकया आधीच शुद्धान्त:करण,
भावनेला आले उमाप उधाण;
उत्कट झालेल्या त्याच्या विचारात
अत्यद्‌भुत शक्ति जाहली उदित !"

शेवटी चवदाव्या दिवशी अभंगाच्या वह्या जळावर तरंगू लागल्या आणि मग विठ्ठलनामाने आकाश भरून गेले.

"अमृतकुंभ" या कथेंत, निसर्गाने सुख आणि दुःख, विष आणि अमृत दोन्ही कसे दिले आहे, पण मानव अमृताकडे दुर्लक्ष करून विषच कसे निवडतो आणि निसर्गाविरुद्ध ओरड करतो, हा मनुष्यस्वभाव रूपकात्मक रीतीने वर्णिला आहे.

'होताच उजळ आभाळ' 'कलेचा जन्म', आणि 'ख्रिस्ताचा खटला' ही अनामिके मधील काव्येहि या दृष्टीने लक्षात घेण्यासारखी आहेत. त्यांचे स्वरूप कथेचेच आहे. अगदी थोडक्यात काही चटकदार प्रसंग त्यांत वर्णिले आहेत.

'कोरकू'

'कोरकू' हे वा. ना. देशपांडे यांच्या काव्याचे एक फार मोठे बिरुद मानले पाहिजे. एका उपेक्षित मागासलेलेल्या जाती[illegible]नी 'कोरकू'च्या रूपाने

काव्यबद्ध केलें आहे. त्यांचा बाह्य आणि आंतरिक परिचय करून दिला आहे. त्यांची व्यथा सांगितली आहे आणि शेवटी कथाहि सांगितली आहे. ओवीसारख्या मुक्तछंदात लिहिलेले ३६ पृष्ठांचे हे लहानसे काव्य फारच रमणीय आहे.

"—त्या संध्याकाळी मला वाटली
अजगरासारखी रात्र
आणि चंद्रकोर वाटली
त्याच्या नखासारखी;
आकाशाच्या जमीनीवर
चंद्रकोरीचे नख रोवून
रात्ररूप अजगराने
दिन—रिपूला सीमेपार हाकलले
आणि गिळले धरामंडळ!"

अशा नाविन्यपूर्ण कल्पनांनी कवीने हे काव्य नटविले आहे.

'त्या रथाची चाके
पुन: फिरू लागताच
आणि तो रथ रस्त्यावरून
पुन: गडगडत जाताच—
मिळणार आहेत कोरकू
तुम्हा—आम्हाला येऊन!'

असा जिव्हाळा आणि आशावाद या काव्यात आहे. कोरकूंचे दारिद्र्य, त्यांचे अज्ञान, त्यांची सुखदु:खे, त्यांचा लाजरेपणा, त्यांच्या अंधश्रद्धा, त्यांची नृत्ये—या सर्वांची धावती वर्णने यात आली आहेत आणि शेवटी भावड्या 'तुमला'च्या बलिदानाची गोष्ट सांगितली आहे. वा. ना. देशपांडे यांच्या काव्यातच नव्हे तर एकंदर मराठी कथाकाव्यात 'कोरकू' हे काव्य विषय, निवेदन, भाषा आणि वृत्त या सर्व दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे.

असा वा. ना. देशपांडे यांच्या कथाकाव्याचा थोडक्यात परिचय आहे. त्यांची भाषा साधी, सोपी व ओघवती आहे. नेमके प्रसंग ते अगदी थोडक्यात उभे करतात. संयम हा त्यांचा फार मोठा गुण आहे. त्यांचे निवेदन फार रेखीव, टापटिपीचे व डौलदार असते. विषय भरदार असतात. उदात्त आणि व्यापक विचारांची प्रेरणा त्यात असते. म्हणूनच कथाकाव्याचे एक सिद्धहस्त रचनाकार, असे वा. ना. देशपांडे यांचे यथार्थ वर्णन करता येईल.

卐

अनुक्रमणिका

जे. कृष्णमूर्ति आणि महाराष्ट्र संत

अप्रबुद्ध

फार वर्षापूर्वीची गोष्ट ! माझे लक्ष त्या वेळेला थिऑसफीचे वाङ्मय वाचण्याकडे लागले होते. बहुमोल पूर्णचंद्रोदयाची एकादी भट्टी फुटून वाया जावी त्याप्रमाणे 'वासंतिकाबाई'चा (Besant) मैत्रेयाचा अवतार घडवून आणण्याचा प्रयोग सपशेल फसला होता. जे. कृष्णमूर्तींच्या वडिलांनी त्यांना ताब्यात घेण्याकरिता हायकोर्टात खटला केला होता. सुविद्य जनतेचे लक्ष जे. कृष्णमूर्तीकडे लागून राहिले होते. खटला संपला. तसे लोकांचे लक्षहि कमी झाले. हळूहळू इतर जागतिक उलाढालींना महत्व आले आणि बराच काळ जे. कृष्णमूर्तींचा जगाला विसर पडल्यासारखे झाले !

परंतु श्रीमती बेझंटबाईंची पुण्याई अशी वाया जाणारी नव्हती. भट्टी फुटल्याप्रमाणे मैत्रेयाच्या बाबतीत जरी त्यांची फसवणूक झाली तरी त्यांची सदिच्छा जे. कृष्णजींच्या रूपाने साकार होऊन प्रगटली. पुन: त्यांचे नाव ऐकू येऊ लागले. हळूहळू त्यांची प्रसिद्धी झाली आणि ते जरी मानवतेच्या पलीकडे असलेल्या कोणत्या तरी विश्वात वावरत असले तरी त्यांच्या मातृभूमीने त्यांना आकृष्ट केले. त्यांच्या महाराष्ट्री भक्तांच्या परिश्रमाने तर अलीकडे त्यांचा लाभ मराठी जिज्ञासूंनाहि किती होतो आहे हे डॉ. अ. ना. देशपांडे यांच्यासारख्या विद्वानाच्या लेखावरून सहज लक्षात येईल. 'युगवाणी'च्या दीपावली अंकातला त्यांचा लेख पाहिला की त्याची साक्ष पटते. मला हा लेख लिहिण्याची बुद्धि तरी तो लेख वाचून होते आहे. इतकेच की हा माझा उद्योग 'प्रतिप्रसव' नाही 'प्रकृतिप्रसव' आहे.

प्रतिप्रसव ?

मला वाटते डॉ. देशपांडे यांचा लेख देखील 'प्रकृतिप्रसव'च असावा. खरे पाहिले तर कृष्णजीसारख्या विश्वदृष्टीच्या साक्षात्कारी व्यक्तीसंबंधी असलेल्या नितांत आदरामुळे तो 'प्रतिप्रसव'च असावयास हवा. परंतु त्यात 'प्रतिबंधकता' आहे. 'प्रतिष्ठे'च्या म्हणजे रूढ ग्रहाच्या आहारी जाऊन तो लिहिलेला दिसतो. म्हणूनच की, काय मला वाटते, श्रीज्ञानेश्वरांचे रहस्य समजून घेताना डॉक्टर-

साहेब बरेच घोटाळले आहेत. नाहीतर, श्रीज्ञानेश्वर महाराज विश्वदर्शी प्रज्ञेचे नसून मराठी पुरते मर्यादितच आहेत असे समजणारे 'तथाकथित' कोण, हे सांगण्याचा 'चोखपणा'हि त्यांनी केला असता. त्याचप्रमाणे, विश्वदर्शी प्रज्ञा असली म्हणजे राष्ट्रवाद अस्तास जातो, हे मोठे तत्त्व सांगताना त्यांनी ज्ञानेश्वर काय नि कृष्णजी काय यांच्या शिकवणीचे साकल्याने परीक्षण केले असते.

संतांचे परिक्षण हे शब्दच चमत्कारिक आहेत. ज्या प्रा. रानडयांचे त्यांनी स्मरण केले आहे, त्यांच्याशीच माझी या संबंधाने बरीच चर्चा झाली होती. इत्यर्थ इतकाच की पुस्तकाला जशी दोन अंगे असतात तशी संताला ही दोन अंगे असतात. परंतु पुस्तक परीक्षा प्रमाणे संत परीक्षण मात्र दोन्ही अंगांनी करता येत नाही. ते त्यांच्या बहिरंगावरूनच (म्हणजे उद्‌गार व कार्य यावद्दलच) करावे लागते. श्रीसमर्थांनी म्हटल्याप्रमाणे 'अंतरवृत्तीचीया खुणा। अंतर्निष्ठ जाणती॥ अशी वस्तुस्थिति असल्यामुळे बहिरंग जे असेल त्यावरूनच कल्पना करावी लागते.

संत आणि विश्वदृष्टि

डॉ. देशपांडे श्रीज्ञानेश्वरीचे व्यासंगी आहेत. 'विश्वदृष्टि' ओळखणारे आहेत. म्हणजे अर्जुनाप्रमाणे 'गांवढे' नाहीत. त्यांचे म्हणणे असे दिसते की, 'विश्वदृष्टि' ही परमार्थमार्गातली. अत्युच्च अवस्था आहे. कृष्णजी हे तिचे अधिकारी आहेत असे त्यांच्या उद्‌गारावरून स्पष्ट दिसते. त्याविषयी काही वाद असण्याचे कारण नाही. तसे त्यांचे बहिरंग म्हणजे उद्‌गार आहेतहि. डॉ. देशपांडे यांचे म्हणणे असे की, श्री ज्ञानेश्वर देखील त्यांच्या जोडीस बसण्याजोगे आहेत. परंतु त्यांच्या 'तथाकथित' भक्तांना तसे वाटत नाही, ही खेदाची गोष्ट आहे. डॉ. देशपांडे यांच्यासारखे विद्वान असे म्हणतात तेव्हा ते तसेच आहे असे समजले पाहिजे. इतकेच नाही तर त्यांचे म्हणणे असे आहे की, साऱ्याच संतांच्या बाबतीत असा अन्याय झालेला आहे. तेव्हा असे का होत असावे ते थोडे खोलात शिरून पाहिले पाहिजे. त्यांचे म्हणणे असे की कृष्णजींच्या उद्‌गारासारखे उद्‌गार काढणारे ज्ञानेश्वर महाराष्ट्रापुरते सीमित असणे शक्य नाही, हे त्यांच्या तथाकथित भक्तांना समजत नाही. हा आरोप कितपत आणि कोणाच्या बाबतीत खरा आहे हा प्रश्न जरी बाजूस ठेवला तरी 'विश्वदृष्टीत' आळंदी व पंढरपूर यांना स्थान नाही असे देशपांडेसारख्यांना का वाटते ते तथाकथित भक्तांना समजत नाही. तेवढयाकरिता हे दोघेहि विश्वदृष्टीचे असता दोघांच्या उद्‌गारात येवढा फरक का पडावा, एकजण अमृतानुभवाचे अध्यात्म बोलून 'गांवढेपणा' पत्करूनहि 'चतुर्भुज' जे ते धरून का ठेवतो आणि दुसरा शिक्षकाची भूमिका घेऊनहि माझ्या विश्वदृष्टीत ते बसत नाही असे का म्हणतो, हे पाहिले पाहिजे.

सदर लेख लिहिण्यात डॉ. देशपांडे यांचा हेतूच मुळी श्रीज्ञानेश्वर आणि कृष्णमूर्ति यांचे साम्य दाखविण्याचा आहे. तेव्हा त्यांनी वैषम्यविचार बुद्धिपुरःसरच गाळला आहे, असे त्यांनी स्पष्टीकरणहि केले आहे. परंतु त्यामुळे, 'शुद्ध असण्यातली' जी महात्मता आहे, जी आनंदघनता आहे, ती दुर्दैवाने आज उपेक्षित आहे' आणि प्रतिष्ठेची भलतीच मूल्ये सांप्रत मान्यता पावलेली आहेत असे मनःस्वास्थ्य नाहीसे करणारे ॲटमबॉंब सारखे दोन अपसिद्धांत त्यांनी वाचकापुढे टाकून दिलेले आहेत. म्हणूनच, त्यांचे लिहिणेहि 'प्रकृतिप्रसव' आहे, असे मी श्री. पु. य. देशपांडे यांचे भाषेत म्हणतो.

शुद्ध 'असणे'

शुद्ध असण्यातली जी महात्मता अथवा आनंदघनता, जी आज उपेक्षित आहे, असे ते म्हणतात ते कोणत्या अर्थाने? बहुजन समाजाचे समर्थांनी केलेले चतुर्विध वर्गीकरण त्यांना मान्य असेलसे वाटते. यातील ज्यांना बद्ध म्हणून त्यांनी म्हटले, त्या संसारार्णवमग्न जीवांना उद्देशून डॉ. साहेबांनी असे म्हटले असेल तर त्यांनी हे लक्षात घ्यावयास हवे की, त्यांच्यात अशी उपेक्षा नव्हती कधी? 'ऊर्ध्व बाहुविरोम्येष नचकश्चित् श्रुणोति मे'। असे अनादिकालापासून चालूच आहे. हल्लीच्या सारख्या भोगैकपरायण झालेल्या मनुष्यात, फार झाले तर, ते फार मोठ्या प्रमाणात आढळून येत असेल इतकेच. त्याचे विशेष वाटण्याचे काय कारण? मुमुक्षु आणि साधक जीवांच्या संबंधी त्यांचा खेद असेल तर तो व्यर्थ आहे. कारण, या जीवांच्या कितीहि निरनिराळ्या अवस्था असल्या तरी, भारतात तरी त्यांना वरील आनंदघनतेचा विसर पडलेला नाही. अद्वैत सांप्रदायाचा संस्कृत अथवा मराठी असा एकहि ग्रंथ नाही की ज्यात त्याचे वर्णन नाही. आचार्यांचे 'नष्टे पूर्वविकल्पे तु यावदन्यस्यनोदयः। निर्विकल्पक चैतन्यं स्पष्टंतावद् विभाव्यते ॥' घ्या किंवा वासिष्ठकाराचे 'निद्रादौजागरस्यान्ते यो भाव उपजायते। तं भावं भावयन् राम अक्षयानंदमश्नुते ॥' हे घ्या, अथवा ज्ञानेश्वरांचे 'अगा अर्जुनपण न घेता। मी ऐसे जे पंडु सुता। उठतसे ते तत्वता। तयाचे रूप' हे घ्या, अर्थ एकच आहे. देशपांड्यांनी खेद करण्याचे काहीहि कारण नाही. आणि यात दुर्दैवी असे काहीहि नाही. जसे हवे तसे उतारे देता येतील. सर्वांचेच तात्त्विक ध्येय ते आहे. त्यात एकता आहे हेहि सर्वसंमतच आहे. 'साधु दिसती वेगळाले। परी ते स्वरूपी मिळाले। अवघे मिळून झाले। देहातीत वस्तु' ॥ असे श्रीसमर्थहि म्हणतात. अशा अनुभवाचा महानुभाव कोठेहि असो व कोणत्याहि समाजात असो, भारतीय मनुष्य त्याला वंद्यच समजतो. कृष्णजी अशा अनुभवाचे—विश्वदृष्टीचे असे मी म्हणत नाही. कारण या संज्ञेने त्यांना नक्की काय म्हणाव-

अनुक्रमणिका

याचे आहे व नवीन काय सांगावयाचे आहे ते मला नीटसे समजत नाही--- पुरुष आहेत असे त्यांचे उद्‌गार दाखवीत असतील तर तेहि आम्हास वंद्यच आहेत.

सिद्धावस्था व लौकिक प्रतिष्ठा

सिद्धावस्थेविषयी भारतीयांची अशी धारणा असली तरी त्यांनी एक महत्तत्त्व ओळखले होते आणि ते हे की, अशी अवस्था हे कोणत्याहि लौकिक प्रतिष्ठेचे हमखास मूल्य होऊ शकत नाही. म्हणून त्याचे वाईट वाटण्याचेहि कारण नाही. याची कारणे दोन आहेत. एक असे की अशी अनुभवावस्था अथवा हिलाच जर श्री. देशपांडे 'विश्वदृष्टि' म्हणत असतील तर ती केवळ अंतर्निष्ठ आहे. तिची खूण सामान्य माणसाने ओळखायची कशी ? आचारावरून ओळखावे म्हटले तर असे पुरुष पुष्कळ वेळा उन्मत्त वा पिशाच अवस्थेत असण्याचा संभव असतो. देहाभिमान गलित झाल्याने कुल्लाल चक्राधीनाप्रमाणे हा पुरुष वागतो आहे, का देहयंत्र विस्कळित झाल्यामुळे वागतो आहे, हे सामान्य माणसाने ओळखावयाचे कसे ? बरे, त्याच्या उद्‌गारावरून ओळखावयाचे म्हटले तर या अद्वय पदाचे इतके वर्णन भारतवर्षात झाले आहे की, पोटभरू हरदासच तर काय पण पोरेसोरेहि ते वाचून तशी भाषा बोलू शकतात. नुसती शंकराचार्यांची वेदान्त स्तोत्रे वाचली तरी हे लक्षात येईल की, जे कृष्णमूर्तींचे Be and becoming भारतीयांना नवीन नाही. भारतीय संतांचे पोटात कृष्णजी वसले तर त्यात काही नवल नाही. नवल आहे ते हेच की ज्ञानेश्वराची आळंदी आणि पंढरपूरचा विठोबा हे 'विश्वदृष्टी'त वसत नाहीत असे भारतीय परंपरेत वाढलेल्या डॉ. देशपांड्यांना वाटते ! '

अद्वैत आणि क्रियाद्वैत

वास्तविक संतवाङ्मयाच्या कोणाहि उपासकास असे वाटण्याचे मुळीच कारण नाही. श्री. देशपांडे यांचा उद्देश अद्वैतसिद्धि करण्याचा आहे. परंतु ही अद्वैतसिद्धि, 'एकमेवाद्वितीयं' अशी गर्जना करणाऱ्या उपनिषदांनीच करून ठेवली आहे. मात्र इतकेच की हे अद्वैत 'देहातीत' असा जो भाव आहे त्यातच प्रतीत होणारे आहे. त्या 'देहातीत'त वस्तूचा जो 'नानात्वभाव' आहे त्यात नाही. त्यांचे तर निक्षून सांगणे आहे की, "भावाद्वैतं प्रकुर्वीत क्रियाद्वैतं न कारयेत" **क्रियाद्वैत करू पहाणे म्हणजे 'नानात्वस्फूर्ती'ला विफळ करण्यासारखेच आहे.** तसे करू म्हटले तरी ते नानात्व पत्करूनच करावे लागते. समर्थांनी तर अगदी निक्षून सांगितले आहे की 'सगुणाचेनि आधारे । निर्गुण पावावे निर्धारे ' ॥ अथवा ' सांडील सगुणभजनासी । तरी तो ज्ञाता परी

अपेक्षी ' ।। हे म्हणणे, अर्थातच, कुल्लालचक्राप्रमाणे ज्यांच्या वाटयास उपदेशकाची भूमिका आली आहे, अशा प्राप्तपुरुषांकरिता आहे. गेंडयाप्रमाणे एकाकी रमणाऱ्यांचा प्रश्नच नाही. त्यांच्या अंतर्वृत्तीची ओळख क्वचितच कोणाला होणार. न कोणाला झाली तरी त्यांचे अथवा कोणाचेहि काही बिघडण्याचे कारण नाही. सिद्ध असून उपदेशकाची भूमिका असणाऱ्यांचाच सारा विचार. सिद्ध लोकात असे भेद पडतात, त्याचे कारण उघड आहे. पूर्वी, या जन्मी अथवा जन्मांतरी त्यांनी जी साधने केली असतात त्यांचेच हे कुलालचक्र होत असते. साधने जरी सहस्रावधि असलीं तरी त्यांचे शास्त्रत: दोनच भेद आहेत. शास्त्रांत निरनिराळचा काळीं जरी निरनिराळचा संज्ञा लोकप्रिय असल्या तरी अनुष्ठेय तात्पर्य तेंच आहे. मराठी संतांचे आन्वयव्यतिरेक, पतंजलीचे संप्रज्ञात आणि असंप्रज्ञात, योग्यांचे तारक आणि अमनस्क अथवा भगवद्गीतेचे सांख्य आणि योग हे ते दोन मार्ग आहेत. अभ्यासदृष्टचा ते अगदी परस्परविरुद्ध आहेत. त्यांच्यात अनेक पर्याय आणि परस्पर मिश्रणांनी हजारो प्रकार झाले असले तरी मूळ तत्त्व एकच. ज्ञानदृष्टीने दृश्याचा 'नेति नेति' असा निरास करून सूक्ष्म होत होत केवळ वस्तुरूप होऊन जाणे, हाच 'विराम प्रत्ययाभ्यासपूर्वक' 'असंप्रज्ञात' आहे. योगी याला 'अमनस्क' म्हणतात आणि गोदोहनानंतर गाईच्या कासेची जी अवस्था होते तशी पूर्ण निर्वेद स्थिति (येथे 'विद' धातु सहाव्या गणाचा आहे; निर्वेद म्हणजे परिपूर्ण काही मिळवावयाचे राहिले नाही अशी अवस्था) हीच कृष्णजींची 'आत्म्याची नग्न अवस्था.' हिचा क्रम, सूक्ष्म सूक्ष्म होत, एकेक वस्त्र टाकीत, नग्न होण्याचा आहे. 'संसार त्याग न करितां । प्रपंच उपाधि न सांडिता । जन्मामध्ये सार्थकता । विचारेचि होय ' ।। असे महाराष्ट्रसंतहि म्हणतात परंतु दंडक मात्र असा आहे की, 'साधनेवीण ज्ञानवार्ता । बोलोचि नये ' ।। असा फरक त्यांच्यात आणि कृष्णजींत का पडतो हे नीट पाहिल्या खेरीज त्यांच्यातील आणि संतांतील साम्याचा विचार पुरा होत नाही.

दुसरा मार्ग

दुसरा मार्ग याच्या अगदी उलट आहे. म्हणजे श्रीसमर्थांनी म्हटल्याप्रमाणे 'राम उपासना माझी ब्रम्हांड व्यापिनी पहा' असा आहे. कदाचित हीच डॉ. देशपांडे यांची विश्वदृष्टि असेल तर याला विश्वदृष्टीचा मार्ग म्हणता येईल. पण मग त्यांची विश्वदृष्टि आणि संतांची विश्वदृष्टि एक नाही असे म्हणावे लागेल. श्रीसमर्थांची रामउपासना हा पतंजलीचा 'संप्रज्ञात' योग आहे. यात निरनिराळचा प्रकारच्या साधनांनी हळूहळू इतके मोठे व्हावयाचे की शेवटी व्यापावयास काहीच न उरल्यामुळे व्याप्यव्यापक भावच नाहीसा होऊन केवळ व्यापकच

उरतो. म्हणजे वर्तुळावर विरुद्ध दिशेकडे तोंडे करून चालणारे हे दोघे शेवटी या एका बिंदूत एकमेकात मिळतात. या स्थळी जो उभा आहे त्याला अर्थातच दोनहि मार्ग स्पष्टपणे दिसले पाहिजेत. याचाच अर्थ असा की या स्थळी पोचलेला सिद्ध दोनहि मार्गाचे गुरुत्व करू शकतो आणि असे जो करू शकतो तोच अधिकारी गुरु, असा भारतीय सिद्धांत आहे. 'सगुण निर्गुण ही ज्याची अंगे। तोची आम्हा संगे क्रीडतसे ॥' या सन्तोक्तीत हा अर्थ आहे. आणि त्यात विपरीत काहीच नाही. ब्रह्मास्त्राने बांधले तेव्हा मारुतिराय सूक्ष्मातिसूक्ष्म होऊन त्यातून सुटून गेले. याच्या उलट सिंहिकेने गिळले तेव्हा ते विशाल होऊन पोट फाडून बाहेर आले. तसेच हे मार्ग आहेत. श्रीज्ञानेश्वर, श्रीएकनाथ, श्रीतुकोबा, श्रीसमर्थ, श्रीनरसिंह सरस्वती इ० महाराष्ट्र संत हे असे अधिकारी गुरु होते असे त्यांच्या चरित्रावरून आणि वाङ्मयावरून म्हणावे लागते.

तारक मार्गाची थोरवी

या दोन मार्गातला कोणता कोणास विहित आहे हे शास्त्र अर्थात स्वतंत्र आहे. एवढे खरे की या दोहोपैकी दुसऱ्याचे, म्हणजे योगात ज्याला तारक म्हणतात त्या मार्गाचे, अनुसरण करण्याची थोरवी जास्त आहे. स्वतः पोहून जाणारा आणि पाठीवर दुसऱ्याला घेऊन पोहून जाणारा हे दोघेहि पोहणे जाणणारेच असतात. दोघेहि एका ठिकाणीच (परतीराला) जातात. हे जरी खरे असले तरी आपल्या-बरोबर दुसऱ्याचा जीव वाचवणाऱ्याची महति, सापेक्ष मूल्ये असलेल्या या भू-लोकात तरी केव्हाहि जास्तच आहे. म्हणूनच, 'एकं सांख्यं च योगं च।' 'सांख्ययोगौ पृथग्बाला: प्रवदन्ति।' 'यत्सांख्यै: प्राप्यते स्थानं तद्योगैरपिगम्यते।' असे म्हणत म्हणतच श्रीकृष्णांनी 'तयोस्तुकर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते।' असे ठासून सांगितले आहे. असे असण्याचे दुसरे एक शास्त्रीय कारण असे आहे की, असंप्रज्ञात आणि संप्रज्ञात हे दोघेहि कर्मत्याग करूनच पूर्ण होत असले तरी असंप्रज्ञाताचा त्याग, त्याचे कर्म निर्बीज करण्यात म्हणजे त्याचे कर्म फलद्रूप होणार नाही, असे निःसत्व करण्यात असतो, तर संप्रज्ञाताचा शास्त्रशुद्ध रीतीने बीजशक्तिसंपन्न अशा कर्मांची पेरणी करून त्याचे पीक जगताला अर्पण करण्यात असतो. दोन्ही मार्गांच्या गुरूतहि हाच फरक रहातो. नुसत्या ज्ञानाच्या गोष्टी शिकवणारा माणूस बहुधा बेजबाबदार असतो. एकादा डॉक्टर जसा रोग्याला पाहून पाचपन्नास रुपयांची इंजेक्शने वगैरे सांगून निघून जातो, तसा तो असतो. रोग्याची परिस्थिति काय आहे, त्याला ती विकत घेण्याची ऐपत आहे किंवा नाही, नसल्यास पर्याय म्हणून त्याला काय सांगावे इत्यादि गोष्टींचा विचार करण्याचे त्याला काम नसते, औषध सांगणे एवढेच त्यांचे काम; मग तो रोगी

अनुक्रमणिका

जगो किंवा मरो, त्याच्याशी त्याचा संबंध नसतो. तसाच हा उपदेशक. उपदेश करणें हे त्यांचे कार्य. त्याचे काय होते हे पहाण्याची जबाबदारी त्यांचेवर नाहीच. उपदेश सर्व निषेधक 'विश्वदृष्टी'चा असला म्हणजे झाले! 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' हा महासिद्धान्तच आहे. त्याचा अर्थ स्पष्ट करण्याकरिता ज्ञानाशिवाय इतर साधनांचा निषेध करावाच लागतो. 'न बुद्धिभेदं जनयेत्' ही मर्यादा पाळण्याचेहि त्याला कारण नाही. श्रोत्यांच्या अधिकार भेदाचा विचार करण्याचे कारण नाही. झाला फायदा तर उपदेशाचा. विचाराशिवाय अन्य साधन नाहीच. फायदा न झाला तर श्रोत्याचा विचार कमी पडला. त्याला गुरु काय करणार? विपरीत परिणाम होऊन अपाय झाला तरी त्याचे काय होणार बापडे? तो तर शुभाशुभाच्या पलीकडे जाऊन बसलेला! त्याचा सिद्धान्तच असतो की, 'साधनाचे पिसे। काय करावे?'

साध्य–साधन–संगति

याच्या अगदी उलट दुसऱ्या मार्गाच्या गुरूची स्थिति असते. 'साध्यचि होऊन तत्वता। साधन करावे॥' अशी त्याची हातोटी. 'साधन आले देहाच्या माथा। आपण देह नव्हे सर्वथा। ऐसा करूनि अकर्ता। सहजचि झाला।' ही धारणा. 'ज्योषयेत्सर्वकर्माणि विद्वान् युक्तः समाचरन्।' असा त्याचा आचार असतो. मग तो कोणत्याहि लिंगाचा असो अथवा कोणत्याहि जातीचा असो. पृथ्वीच्या पाठीवर कोठेहि जन्मला असो. तेथला आचारविचार रक्षूनच तो आपले उपदेशकार्य करणार. प्रसंगविशेषी त्याला कर्मनिंदा करावीहि लागेल; विचारावरहि धार धरावी लागेल. पण त्यातहि हेतु साधन लावण्याचाच. त्याने केलेल्या पूर्वसाधनांचा लाभ तर जगास मिळतोच, परंतु त्याच्यापासून निघणारा साधन-सुगंध साधकांची दिशाभूल न होऊ देता त्यांना मार्गावर ठेवतो. साधकाला 'चिरजीवन' (Life eternal) न मिळाले तरी हरकत नाही. 'तैसा उपायाचा अपाये। विपरीतपणे स्वहित जाये॥' असे त्यांचे होऊ नये येवढी तरी साधकांची चिंता ते वहातातच. साक्षात्कार दृष्टया या दोन्हीहि प्राप्त पुरुषांचा अनुभव एकच असतो. डॉ. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे ते स्थलकालातीत असतात. जाति, पंथ, संप्रदाय, वंश, राष्ट्र यांच्या अतीत असतात हे खरे आहे. मात्र त्यांची कोटि एकच असते असे निदान भगवान श्रीकृष्ण तरी म्हणत नाहीत. 'तयोऽस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते' असे म्हणून ते त्यांची कोटि वेगळी काढतात व स्वतःच्या उदाहरणाने त्या कोटीचे वर्णनहि करतात. त्यांच्या विश्व-दृष्टीत साधकदृष्टया 'देश, काल, जाति, पंथ, संप्रदाय; वंश, राष्ट्र इतकेच तर काय पण डॉ. देशपांडे यांनी ज्यांचीं कीव केली आहे ती 'तथाकथित भक्तां'ची

अनुक्रमणिका

सांप्रदायिकताहि बसते. 'योयच्छ्रद्धः स एव सः' असे त्यांचे शास्त्र आहे. श्रद्धा शुद्धसात्विक असली तर विपरीत असणारी गोष्टहि 'तेऽपि मामेव कौंतेय भजत्न्यविधिपूर्वकम्' अशी गोड करून घेण्यास त्यांची तयारी आहे. जीवांच्या अवस्था आणि साधनांचे पर्याय यांना अवश्य असलेली सांप्रदायिकता जर विश्वदृष्टीत बसत नसली तर विश्वदृष्टीत कोठे तरी उणेपणा आहे, कोठेतरी ती सीमित झाली आहे असे म्हटले पाहिजे.

सिद्धावस्थेच्या दोन कोटि

यावरून हे सहज लक्षात येईल की सिद्धावस्था ही जरी एकच असली तरी या प्राप्त पुरुषाच्या दोनच कोटी असू शकतात. एक वरीलपैकी कोणत्या तरी प्रकारच्या लोकांची व दुसरी या दोन्ही प्रकारांनी अनुभव देणारांची. संतवाङ्मयाचा अल्पस्वल्पहि परिचय असणाऱ्या कोणाच्याहि सहज लक्षात येते की महाराष्ट्रातील श्रीज्ञानेश्वरादि संत हे या दुसऱ्या कोटीत पडणारे आहेत. इतकेच नाही तर त्यांच्यात काही आणखी विशेष आहे. नुसता उपदेश केला की संपले अशी त्यांची धारणा नाही. त्यांची कास धरणाऱ्यासंबंधी त्यांच्याजवळ विलक्षण कळवळा आहे. अंतिम सत्य लोकांना सांगण्याच्या ओढीपेक्षा 'पडति हाति काळा। म्हणून येतसे कळवळा'. त्यांच्या उपदेशाची स्फूर्ति या कळवळ्यातून आहे. आपल्याकडे आलेल्यांची ते 'शरणागताची वाहे चिंता। तो येक सद्गुरुदाता। जैसे बाळक वाढवी माता। नाना यत्ने करूनी'॥ अशी जोपासना करीत. तेवढ्याकरिता त्यांचे म्हणणे असे आहे की, 'हा गा शरीर जरी जाहले। तरी कर्तव्य ओघे आले। मग उचित का आपुले। वोसंडावे'॥ स्वतः 'विश्वदृष्टी'चे असले तरी त्यांचा दंडक असाच होता की 'मार्गाधारे वर्तावे। विश्व मोहरे लावावे। अलौकिक न व्हावे। लोकाप्रति'॥ निजवृत्ति न सांडिता 'मार्गी अंधासरिसा। पुढे देखणाही चाले जैसा। अज्ञाना प्रकटवा धर्म तैसा। आचरोनी॥' असा त्यांचा आदेश आहे. नुसत्या अद्वैताच्या उपदेशाला त्यांच्या जवळ किंमत नाही. 'बोलाचीची कढी। बोलाचाची भात। जेवूनीया तृप्त कोण झाला!' त्यांचा भर साधनयुक्त ज्ञानावर आहे. नुसत्या ज्ञानावर नाही. हाच त्यांच्यात आणि जे. कृष्णमूर्ती सारख्या विश्वदृष्टींच्या महात्म्यात मोठा फरक आहे श्रीसमर्थ तर ठासून सांगतात 'सांडील सगुण भजनासी। तरी तो ज्ञाता परी अपेशी'॥!

'साधनानाम् अनेकता'

साधनानामनेकता हा भारतीय ज्ञानाचा विशेष आहे. परंतु त्या साधनांचीहि साधकाच्या अवस्थाप्रमाणे व्यवस्था लावून कोणाचाहि बुद्धी भेद न करता गुरुत्व

केले पाहिजे, हे या संतशिरोमणींनी पुरे ओळखले होते. ग्रंथातील वचनांची संगति अशा धोरणानें लाविली पाहिजे हे सांगताना समर्थांनी श्रीकृष्णाचेच उदाहरण दिले आहे. 'ऐसे कृष्ण कां बोलिला। साधन मार्ग दाखविला। खडे मांडूनि शिकविला। ओनामा जेवि'॥ ज्ञानेश्वर म्हणजे आपेगाव, आळंदी, पंढरपूर. ज्ञानेश्वर म्हणजे वारकरी संप्रदाय, ज्ञानेश्वर म्हणजे महाराष्ट्र असे, म्हणताना 'तथाकथित' भक्त ज्ञानेश्वरांना सीमित करीत नाहीत तर साक्षात्काराच्या पायऱ्या म्हणूनच ओळखतात. विश्वदर्शी प्रज्ञेचे आवाहन त्यांना समजले नसले तरी 'विश्व ब्रह्मचि केले' हे ते विसरत नाहीत. डॉ. देशपांडयांनी चिडण्याचे अथवा खेद करण्याचे काहीच कारण नाही.

साधनावीण जर श्रेष्ठ ज्ञान सांगितले अथवा त्या साधनात अशी व्यवस्था न ठेविली तर नुसत्या ज्ञानाने फायदा तर होत नाहीच उलट ऐकणाऱ्यांचे नुकसान होण्याचाच संभव जास्त असा नित्य अनुभव आहे. वामनपंडित म्हणतात 'या कारणे तया। चाळूच नये धनंजया। की काम्यापासून चळलिया। उभय भ्रष्ट ते होती॥ बुद्धि चाळिता ते खवळती। निष्कामी तो न वळती। थित्या पुण्यकर्मापासूनी चळती। चाळू नये तया लागी॥' हा अनुभव सत्य असल्यामुळेच संतांचा बाणा असा होता की 'अधिकार तैसा देऊ उपदेश।'

जे. कृष्णमूर्तींची केवळ व्यतिरेक दृष्टि

जे. कृष्णमूर्तींचा माझा प्रत्यक्ष असा कोणताच संबंध नाही. जो काय थोडा बहुत परिचय आहे, तो वाङ्मयद्वारा. त्यावरून असे वाटते की त्यांच्या आणि आणि महाराष्ट्र संतांच्या वेदांतविषयक उद्गारांत डॉ. देशपांडे यांनी दाखविल्या-प्रमाणे साम्य दिसते खरेच. दोघांचीहि विश्वदृष्टीच. परंतु कृष्णजींचा केवळ व्यतिरेक आणि संतांचा समन्वयावरील भर हे पाहिले म्हणजे असे म्हणावेसे वाटते की या दोन 'विश्वदृष्टीत' जमीन अस्मानाचे अंतर, आहे! 'नेति' 'नेति' म्हणणारी कृष्णजींची दृष्टि ही 'विश्वदृष्टि' नाही. विश्वनिरासदृष्टि आहे. 'विश्वी विश्वंभरचि भरला। आपणा वेगळा कोण जाला। स्वसौख्य बोधे पूर्ण झाला। विलास केला स्वानंदे॥' अशा रीतीने जगाकडे पहाणारी संतांची दृष्टि ही खरी 'विश्वदृष्टि'. विश्व शब्द दोघात आहे एवढेच त्यांचे साम्य!

卐

आधुनिक संस्कृत कथा

प्रा. श्रीधर भास्कर वर्णेकर, नागपूर

संस्कृत कथा आणि ती आधुनिक ! अशक्य ! सर्वथा अशक्य !! 'मृत' भाषेत आधुनिक वाङमय कसे असणार ? संस्कृत कथा, कविता, नाटके इत्यादि साहित्य म्हणजे, इतिहास संशोधन करून विश्वविद्यालयाची वरिष्ठ उपाधि मिळविण्याचा विषय ! त्यात आधुनिकता असणे शक्य नाही !

हा प्रामाणिक समज अनेक सुशिक्षितांनी सुद्धा उराशी कवटाळून ठेवलेला आहे. कारण ? कारण त्यांना कधी काळी कोणी तरी सांगून ठेवले की, संस्कृत ही 'मृतभाषा' आहे. संस्कृतावरील हा मृतभाषेचा दुष्ट आरोप आता मृत-साफ ठार-झाला आहे. संस्कृत ही अखिल भारतीय भाषांना केवळ जन्म देऊन मुक्त झालेली 'जननी'च नसून ती त्यांची प्राणशक्ति आहे. भारतातील सर्वात अधिक जिवंत भाषा कोणती ? स्थलदृष्टचा व कालदृष्टचा सुद्धा ? या प्रश्नाचे उत्तर एकच आहे. व ते म्हणजे संस्कृतभाषा ! अमृतवाणी !! अमरवाणी !!!

इतिहास-लेखकांची चूक

संस्कृत साहित्याचे इतिहास ग्रंथ १९व्या शतकाच्या उत्तरार्धापासून लिहिण्यास प्रारंभ झाला. १८६० साली Ancient Indian literature हा मोक्षमुल्लरभट्ट (मॅक्समुल्लर साहेब)यांचा ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर; वेबर (१८७८), मॅक्डोनेल (१९००), कीथ, त्यानंतर श्रडर (१९०३), ओल्डेनबर्ग (१९०३), त्यानंतर विंटरनिट्झ (१९०४); व्ही हेन्री इत्यादि अनेक युरोपीय विद्वानांनी आपापल्या इंग्रजी, जर्मन, फ्रेंच इत्यादि भाषांत संस्कृत साहित्याचा सर्वंकष परामर्श घेणारे मोठमोठे इतिहासग्रंथ प्रकाशित केले. या यूरोपीय लेखकांनी ज्या काळात हे ग्रंथ लिहिले त्या काळात, म्हणजे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात, त्यांना उपलब्ध झालेल्या साहित्याचा परामर्श त्यांनी आपापल्या दृष्टिकोणातून घेतला. बहुतेक सर्व लेखकांनी १७ व्या शतकापर्यंतच्या साहित्याचा इतिहास लिहिला. (त्यात सुद्धा १७ व्या शतकातील अनेक प्रमुख साहित्यिकांचा उल्लेख आलेला नाही.)

यूरोपीय पंडितांच्या पावलावर पाऊल टाकून दासगुप्त, डे, वरदाचारी प्रभृति अनेक भारतीय विद्वानांनी संस्कृत साहित्याचे इतिहास लिहिले. शेवटचा

इतिहासग्रंथ म्हणजे मेरठचे विद्यामार्तंड आचार्य द्विजेन्द्रनाथशास्त्री यांचा "संस्कृतसाहित्यविमर्शः"! या सर्व भारतीय इतिहास-लेखकांमध्ये परप्रत्यय-नेयतेचा फार मोठा दोष आढळून येतो. यूरोपीय इतिहास-लेखकांनी १७ व्या शतकापर्यंतच्या साहित्याचा परामर्श घेतला म्हणून यांनीहि तोच कित्ता गिरवला!

मोठा अपवाद

याला काही तुरळक अपवाद आहेत. सर्वात मोठा अपवाद म्हणजे डॉ. माडिभाषी कृष्णम्माचारियर (M. A., M. L., P. h. D.) व त्याचे पुत्र श्रीनिवासाचारियर यांचा History of Classical Sanskrit Literature हा बाराशे पृष्ठांचा भक्कम ग्रंथ. डॉ. कृष्णम्माचार्यांनी आपली जिल्हा न्यायाधीशाची नोकरी सांभाळून पराकाष्ठेच्या प्रयासाने हा संस्कृत साहित्याच्या इतिहासातील युगप्रवर्तक ग्रंथ लिहिला. १७ व्या शतकानंतर १९३५ पर्यंत लिहिलेल्या (प्रकाशित व अप्रकाशित) सहस्रावधि ग्रंथांची व त्यांच्या लेखकांची भरपूर ओळख श्री. कृष्णम्माचारियर यांनी आपल्या ग्रंथात करून दिली. ही माहिती गोळा करण्यासाठी प्रत्येक लेखकामागे चार आणे या हिशेबाने, त्यांनी स्वतःच्या पदराला खार लावून घेतला. (The acquisition of the material gathered in this book has been too costly for an equanimous retrospect and I shall not be far wrong to say that each author, save those few that are too well-known, cost me on an average four annas.)

डॉ. कृष्णम्माचारियर महाशयांनी एवढी प्रचंड माहिती गोळा केली खरी, पण त्यांच्या प्रकाशकांनी एखाद्या वाण्याच्या वहीखात्याप्रमाणे एवढ्या मोठ्या ग्रंथात अगदी बारिक अक्षरात अक्षरशः कोंबून दिली. परिशिष्ट नसते तर ही सारी माहिती असून नसल्यासारखी झाली असती. डॉ. कृष्णम्माचारियर यांचा हा इतिहास-ग्रंथराज म्हणजे संस्कृत भाषेप्रमाणेच तिच्या साहित्याची ही परम्परा अद्ययावत् कशी जीवित आहे याचा अतिप्रचंड पुरावा आहे.

जागतिक कथावाङ्मयाचा परामर्श घ्यावयाचा उद्योग कोणी केला तर त्याला प्रारंभीच्या कथा संस्कृतातच सापडतील. जगातल्या सर्व भाषात ज्याची अत्यंत प्राचीन काळापासून भाषांतरे झाली असा कथासंग्रह संस्कृतातच आहे— 'पञ्चतंत्र' (बर्नार्ड शॉला सुद्धा या कथासंग्रहाचे वेड होते म्हणतात.) रामायण, महाभारत, भागवत, अष्टादश पुराणे–उपपुराणे हे सारे कथासरितांचे महासागरच! या व्यतिरिक्त, अनेक कथामंजऱ्यांना व कथासरित्सागरांना जन्म

अनुक्रमणिका

देणारी लक्षश्लोकात्मक बृहत्कथा वेगळीच ! अनन्तो वै वाचां विषयः ! अनन्तो वै संस्कृतकथानां विषयः !!

संक्षिप्त कथा

अर्वाचीन संस्कृत लेखकांनी या प्राचीन प्रचंड कथासागरांचा संक्षेप करण्याचा उद्योग मोठ्या प्रमाणात केला. याचे एक ध्येयवादी कारण म्हणजे, एवढ्या प्रचंड ग्रंथांना हात लावायला देखील आजच्या ओढघस्तीत सापडलेल्या रसिकाला सवड सापडत नाही व दुसरे व्यावहारिक कारण म्हणजे असले संक्षिप्त ग्रंथ विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट होऊ शकतात.

एकट्या रामायणकथेचे सार सांगणारे पन्नासपेक्षा अधिक कथासंग्रह (गद्य व पद्य) आज उपलब्ध आहेत. त्यातील ८-१० अपवाद सोडले तर बहुतेकांचे लेखक अर्वाचीनच आहेत. याच प्रमाणात व इतर महान कथाग्रंथांचे सारग्रंथ आधुनिक संस्कृत लेखकांनी लिहिलेले आहेत. गुरुवर्य महामहोपाध्याय डॉ. मिराशी यांचा 'हर्षचरितसार' बहुतेक सर्व संस्कृत विद्यार्थ्यांच्या परिचयाचा आहे. श्री. महादेव शिवराम आपटे यांचा 'कादंबरी-सार' देखील काहींच्या परिचयाचा असेल. जुन्या सर्वच कथाकाव्यांचे सारग्रंथ (गद्यात्मक व पद्यात्मक) आजवर झालेले आहेत एवढे सांगितले म्हणजे पुरे !

पौराणिक कथा

पुराणातील देवदेवतांच्या कथा हा संस्कृत साहित्यिकांचा विशेष आवडीचा विषय ! त्यातील निरनिराळे कथाप्रसंग उचलून काव्यात्मक शैलीत त्याचे कथन करण्याची कालिदास, माघ, हर्ष, भारवि यासारख्या महाकवींनी निर्माण केलेली परम्परा आधुनिक संस्कृत लेखकांनी यथापूर्व अखण्डित ठेवलेली आहे. सुप्रसिद्ध केरलीय पंडित रामपाणिनाद (१८ श.) यांचे विष्णुविलसितम्; वेंकट कृष्णयज्वा (१७ श.) यांचे नटेशविजयम्; "मायावादिमदगजकण्ठीरवाचार्य" श्रीयुत अभिनव रामानुज (१९ श.) यांचे श्रीनिवासगुणाकरम्; मित्रगोष्ठी या संस्कृत मासिकाचे सम्पादक विधुशेखर भट्टाचार्य याचे उमापरिणयम् व हरिचन्द्रचरितम् यासारखे शेकडो काव्यात्मक कथासंग्रह या सदरात जमा होतील. नौखालीचे अन्नदाचरण यांचे महाप्रस्थानम् व हिंदु विश्वविद्यालयाचे प्राध्यापक बहुकनाथ शर्मा यांचे 'सतीस्वयंवरम्' हे ग्रंथ या सदरातील अद्ययावत् ग्रंथ समजता येतील. दिवाकर कविचन्द्रासारखे राजे व तंजोरच्या तुकोजी राजाचे मन्त्री आर्यक घनश्याम यासारखे लेखकहि या प्रभावळीत आहेत. मद्रासच्या वरिष्ठ न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्हो. कृष्णस्वामी अय्यर यांच्या मार्गदर्शं-

कत्वाखाली 'आर्यचरितम्' नावाचा मोठा पुराणकथासंग्रह मद्रासमध्ये प्रकाशित झाला. हिंदु संस्कृतीचे उदात्त आदर्श दाखविणाऱ्या उत्कृष्ट पौराणिक कथा या 'आर्यचरितम्'मध्ये संगृहीत करण्यात आलेल्या आहेत. विशिष्ट ध्येयवादाने प्रेरित होऊन केलेला हा एक महत्वाचा कथासंग्रह आहे.

राजांच्या कथा

"एक होता राजा अन् एक होती राणी" हे वहुतेक लोककथांचे आरंभीचे वाक्य! आज राजे गेले तरी त्यांच्या कथा चालूच आहेत. पुढे 'राजा' शब्दाचा अर्थ कोषांत पाहण्याचे दिवस आले तरी या कथा चालूच राहणार आहेत. Long live the king!

आधुनिक संस्कृत कथाकारापैकी कित्येकांनी या राज-कथात भर घातलेली आहे. रत्नसिंहाने 'मिथिलेशचरितम्'मध्ये दरभंगा राजवंशीय नृपतींच्या कथा सांगितल्या, कविकुञ्जराने 'राजशेखरचरितम्' अर्थात् 'सभारंजन प्रकरणम्' या पुस्तकात राजशेखराच्या कथा वर्णिल्या. 'चोलवंशावलिचरितम्' अर्थात् 'बृहदीश्वरमाहात्म्यम्'मध्ये बृहदीश्वर मंदिराच्या व तंजोरच्या चोलवंशीय राजाच्या कथा निवेदिल्या आहेत. एकाम्बर कवीने मुंमुडी-केम्प वीराप्पा गौड नामक म्हैसूर नृपतीच्या कथा 'वीरभद्रविजयम्'मध्ये सांगितल्या. वीरभद्राच्या महोत्सवाचे वर्णन करण्याच्या उद्देशाने हा ग्रंथ लिहिण्यात आला.

साम्प्रदायिक कथा

बौद्धांच्या जातककथा हे कथा वाङ्मयाचे अतिप्राचीन पण अति नाजुक व पवित्र लेणे आहे. बौद्धांच्या पाषाण लेण्यापेक्षा हे वाङ्मयलेणे अधिक हृदयंगम आहे! एखाद्या मठमंदिरासारखे पवित्र आहे!! मध्ययुगीन असंख्य संतांच्या जीवनाशी संबंधित असलेल्या अतिशयोक्तिपूर्ण दंतकथांनी जातककथांची परम्परा चालविलेली आहे. सकलचन्द्राचे अन्तेवासी श्यामसुंदर यांनी 'कालकाचार्य कथा नावाच्या ग्रंथात कालकाचार्य नावाच्या जैन स्थविराच्या कथा सांगितल्या आहेत. जयकीर्तीचे श्रीपालचरितम्, देवराजगणीचे गद्यपाण्डवचरितम्, भावचन्द्रसूरीचे अमरदत्त मित्रानन्दचरितम्, राजशेखर सूरीचा 'चौऱ्यासी प्रबन्ध', भावचन्द्राचे 'धनदत्तचरितम्,' हंसगणीचे 'भावनाभानुकेवलीचरितम्' व दयावर्धनगणीचे 'रत्नशेखरचरितम्' यासारखे जैनसाम्प्रदायिक कथासंग्रह त्या सम्प्रदायाच्या जिज्ञासूंना उपयुक्त ठरतील. या व्यतिरिक्त चारुचंद्रविरचित' उत्तराकुमारचरितम्'; शुभवर्धनविरचित 'पद्मचरितम्', शुभवर्धनगणिकृत 'बलभद्रचरितम्'; ज्ञानसागरविलिखित विमलनाथचरितम्, इन्द्रहंसगणिविरचित 'विमलसहचरितम्'; मल्लीसेनविरचित उदयनराजचरितम्; गंगाधर विरचित 'वसुमतीचित्रसेनम्',

चन्द्रप्रभामहत्तर विरचित विजयचन्द्रचरितम् व महेश्वरविरचित साहसांकचरितम् हे जैनकथांचे ग्रंथ पद्यमय असून ते सर्व मुद्रित आहेत.

भाषान्तरित कथा

भारतातील सर्वच प्रादेशिक भाषांचे साहित्य आरंभीच्या काळात संस्कृत ग्रंथांच्या भाषांतरांनी समृद्ध झालेले आहे. ही भाषान्तरे क्वचित् शब्दशः तर कधी भावार्थपर आढळतात. मराठीचे सारे संतवाङमय वाल्मिकी–व्यासोच्छिष्टावर पोसलेले आहे असे म्हटले तर प्रत्यक्ष संतांना देखील अभिमानच वाटेल. अन्य-भाषीय ग्रंथांचे संस्कृतात अनुवाद झाल्याचे गेल्या शतकापर्यंत आढळत नाही. नाही म्हणायला नाटकातील प्राकृताच्या छाया संस्कृतात दिलेल्या आढळतात. त्याचें कारण संस्कृत ही बहुसंख्य जनतेची भाषा होती. प्राकृत समजणाऱ्यांची संख्या विशिष्ट प्रदेशापुरती मर्यादित असल्याने सर्वांना ती कळावी म्हणून त्यांची संस्कृत छाया सोबत जोडण्यात येई. प्राकृत जर बहुसंख्यांची भाषा असती तर संस्कृत भाषणांच्या प्राकृत छाया नाटकात दिसल्या असत्या हे उघड नाही काय ?

१९ व्या शतकापासून निरनिराळ्या भाषेतील उत्कृष्ट ग्रंथांचे संस्कृत अनुवाद होण्याचे कार्य सुरू झालेले आहे. 'अमृतातेहि पैजा जिंकणाऱ्या' ज्ञानेश्वरीचे सुद्धा अति सरस व सुबोध संस्कृत भाषेत अनुष्टुप् छंदोबद्ध भाषांतर झालेले आहे ही गोष्ट अनेकांना माहित नाही. कित्येकांनी तर 'ज्ञानेश्वरीचे संस्कृत भाषांतर करण्याइतके हास्यास्पद " असा दृष्टांत देऊन ज्ञानेश्वरीच्या संस्कृतीकरणाचा उपहास देखील आपल्या लेखातून व भाषणातून करून टाकलेला आहे. असो !

अन्यभाषीय ग्रंथांचे संस्कृत अनुवाद करण्याचे प्रमाण हल्ली फार झपाटयाने वाढत आहे. आजवर उपेक्षित राहिलेले एक वाङ्मयीन कार्य आकारास येत आहे, हाच त्याचा अर्थ ! मद्रासचे विख्यात संस्कृत साहित्यिक अॅड्. वाय्. महालिंग-शास्त्री (मद्रासच्या हिंदुमध्ये संस्कृत ग्रंथांचे अभिप्राय लिहीत असतात.) यांनी तामिळकवयित्री औवय्यी (तामिळनाडची जनाबाईच समजा) हिच्या काही सुभाषित काव्यांचा अनुवाद "द्राविडार्या सुभाषित सप्तति: " या नावाने काही वर्षांपूर्वी प्रकाशित केला. आपल्या या अनुवादाच्या प्रस्तावनेत या संबंधात त्यांनी जो स्वानुभव सांगितला तो चिरस्मरणीय आहे. अॅड्. महालिंगशास्त्री लिहितात:–

My Experiment in translating English and Tamil poems have shown me that the poetic efforts in the other languages come off beautifully in Sanskrit and even look enriched, more tidy and majestic in the new garb. Every attempt in that line seems to

reveal to me the immence potentialities of this most ancient language—its flexibility, roominess, surprising aptitude for sukkling into felicitous moulds of excelling brilliance and brevity, its music and its incomparable dignity. Due to the kinship of the two cultures translation from Tamil into Sanskrit is not a literary feat, but an easy walkover into an equally commodious, well–furniseed adjacent parlour"

महालिंगशास्त्रींचे हे उद्गार कानामात्रासुद्धा खरे आहेत. अनुवादित कथाग्रंथांपैकी वडुवूर डोरास्वामी अयंगार यांनी लिहिलेली 'मेनका' ही प्रसिद्ध तामिळ आख्यायिका डी. टी. ताताचार्य यांनी क्रमशः अनुवादित करून उद्यानपत्रिकेत (एक संस्कृत मासिक) प्रकाशित केली. पिठापुरच्या जग्ग कवीचे पुत्र श्री तिम्मकवि यांनी 'सुजनमनःकुमुदचंद्रिका' नामक आपल्या तीर्थरूपांचा तेलगु कथासंग्रह संस्कृतात अनुवादित केला. म्हैसूरचे एस् वेंकटरामशास्त्री यांनी निरनिराळ्या प्रादेशिक भाषातील उत्कृष्ट शंभर कथा 'कथाशतकम्' या ग्रंथात संगृहीत केल्या (१८५८ साली मुद्रित). जगन्नाथप्रसाद यांच्या 'संसारचक्र' नामक हिंदी कथेचे श्री अनन्ताचार्य यांनी संस्कृत भाषांतर केले (प्रकाशित). बंकिमचंद्रांच्या कपालकुण्डलेचा, कलकत्त्याच्या मेट्रोपोलिटन कॉलेजचे संस्कृत प्राध्यापक श्री हरिचरण भट्टाचार्यांनी, दुर्गेशनंदिनी व क्षत्रियरमणी या बंगाली कथांचा तिरुमल ताताचार्यांनी, बंकिमचंद्रांच्या 'लावण्यमयी'चा श्री आप्पाशास्त्री राशीवडेकरांनी, अनुवाद केलेला असून हे सारे अनुवादग्रंथ प्रकाशित झालेले आहेत.

अभिनंदनीय प्रयत्न

भाषांतरित ग्रंथामध्ये विशेष उल्लेखनीय प्रयत्न म्हणजे मुंबईच्या विल्सन कॉलेजमधील पर्शियनचे प्राध्यापक श्री एस्. अहमद यांचा. अल्मदयनी नामक ९ व्या शतकातील अरेबिक लेखकाने "अल्फरज्बादाष्पिद्द" नावाचा ऐतिहासिक कथासंग्रह लिहिला. त्याचा पर्शियन अनुवाद देहिस्तानी नावाच्या पर्शियन लेखकाने केलेला होता. प्रा. एस् अहमद यांनी संस्कृत भाषेचा स्वाध्याय वाढविण्यासाठी या पर्शियन भाषांतराचे संस्कृत भाषांतर "दुःखोत्तरं सुखम्" या नावाने केले. त्यात व्यासवाल्मीकींच्या सुभाषितांचाहि वापर केला आहे. १९२५ मध्ये सर चिंतामणराव देशमुख यांच्या प्रस्तावनेसहित लाहोरच्या विरजानंद प्रेसमध्ये हा कथासंग्रह प्रकाशित झाला. आज तो दुर्मिळ आहे. मला तो मुंबईत रस्त्यावर विक्रीसाठी

पसरलेल्या जुन्या पुस्तकांच्या ढिगात मिळाला. यासारखा एक प्रयत्न १५ व्या शतकात झाला होता. श्रीवर नामक पंडिताने 'युसुफ झुलेखा' यांच्या प्रणय-कथांचा संस्कृत अनुवाद केला होता.

अरेबियन् नाइटस् मधील 'अल्लाउद्दीन चिरागे चीन' या प्रदीर्घ कथेचा अनुवाद कै. आप्पाशास्त्री राशीवडेकरांनी केला* व अलिबाबा चाळीस चोर या कथेचा अनुवाद पुण्याचे श्री गोविंदकृष्ण मोडक यांनी हितोपदेशाच्या पद्धतीनुसार केला. (कर्नाटक प्रिंटिंग प्रेसमध्ये १९३४ साली छापला.) संपूर्ण 'अरेबियन नाइटस्'चे देखील 'आरब्ययामिनी' या नावाचे भाषांतर झालेले आहे.

श्री महेन्द्रनाथ विरचित 'श्री श्री रामकृष्णकथामृत' या पंचभागात्मक बंगाली ग्रंथाचा संक्षिप्त संस्कृत अनुवाद श्री जगन्नाथ स्वामी यांनी केला असून ब्रह्मपुर (ओरिसा)च्या शिरोमणि मुद्राशालेत तो प्रकाशित झाला. कै. न. चिं. केळकर यांच्या 'बलिदान' कथेचे उत्कृष्ट संस्कृत भाषांतर श्री लाटकरशास्त्री यांनी केले असून प्रत्यक्ष तात्यासाहेब केळकर यांनीच त्याची प्रशंसा केलेली आहे. भाषांतरित संस्कृत कथासंग्रहापैकी नुकताच (१९५७) प्रकाशित झालेला महत्त्वाचा संग्रह म्हणजे कथामंजरी. अरविंदाश्रमाच्या मातुश्रींनी लिहिलेल्या Belles Histoirs=बेल्जिस्तवार नामक फ्रेंचभाषीय नीतिकथांचा प्रस्तुत अनुवाद अरविंदाश्रमातले एक संस्कृतज्ञ साधक श्री जगन्नाथ यांनी केलेला आहे. भाषा अत्यंत सुबोध असून अरविंदाश्रमाचे मुद्रण म्हटल्यानंतर ते सुबक व सुंदर आहे हे सांगावयास नकोच.

टाल्सटायच्या—'A spark neglected burns the house या कथेचा ओबडधोबड अनुवाद गुंटूरचे डॉ. को. कृष्ण सोमयाजी यांनी केलेला आहे. डॉक्टर महोदयांचा प्रयत्न स्तुत्य, पण भाषा सदोष आहे.

संस्कृत कथा–स्पर्धा

आधुनिक संस्कृत कथावाङ्मयाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा उपक्रम कै. देवदास गांधी (महात्माजींचे सत्पुत्र) यांनी व्यक्तिशः मजकडून करवून घेतला. 'यूनेस्को'च्या वतीने जगातील निरनिराळ्या भाषातील कथांची स्पर्धा त्या त्या भाषेच्या एखाद्या वृत्तपत्रातर्फे चालविण्यात येते. 'संस्कृत भवितव्यम्' तर्फे अखिल भारतीय संस्कृत कथा–स्पर्धा आम्ही आयोजित करावी असे श्री देवदास गांधींनी मला लिहिले. व त्या स्पर्धेतील पारितोषिकासाठी १२०० रुपयांचा निधि त्यांनी स्वतः दिला. ही स्पर्धा प्रसिद्ध करताना व्यक्तिशः आम्हास तिच्या

[* The Sanskrit Translation of राशीवडेकर excells the original in naration इति. डॉ. कृष्णम्माचार्य]

यशासंबंधी मोठी शंका होती. पण आश्चर्य हे की या संस्कृत कथा-स्पर्धेसाठी दीडशेपेक्षा अधिक संस्कृत कथा भारताच्या सर्व प्रांतातून आल्या. त्यात काही लेखिकांनी सुद्धा भाग घेतला होता. भारताच्या वरिष्ठ न्यायालयाचे माजी न्यायाधीश श्री पतंजलि शास्त्री व महामहोपाध्याय डॉ. मिराशी या स्पर्धेचे परीक्षक होते. कथास्पर्धेचा आयोजक म्हणून व्यक्तिशः मला देखील यांच्या परीक्षाकाचे काम करावे लागले. या स्पर्धेत डेहराडूनच्या उत्तराखंड विद्यापीठाचे संचालक श्री पुरुषोत्तमशास्त्री डोभाल यांच्या **आचार्यस्य व्यतिक्रमः** या अद्य-यावत् कथातंत्रानुसार लिहिलेल्या कथेस पाचशे रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळाले व तिचा इंग्रजी अनुवाद जागतिक कथास्पर्धेसाठी धाडण्यात आला. महाराष्ट्राचे अतिप्रिय कथालेखक श्री महादेवशास्त्री जोशी (पुणे) यांच्या **'पर्जन्य कुण्डम्'** या कथेला दुसरे चारशे रुपयाचे पारितोषिक मिळाले. उरलेला पारितोषिकाचा निधि श्रीवैद्यनाथ शर्मा (ब्रह्मपूर-ओरिसा) यांच्या 'भाग्यचक्रम्' या कथेला श्री पिचुमणि अय्यंगार (मद्रासी पत्रकार) यांच्या 'किमहं पतिता' या कथेला, व नागपुरचे श्री. श्या. गो. गर्दे यांच्या 'कृपणस्य दित्सा सम्मूता' या कथेला वाटून देण्यात आला. या सर्व कथा पुस्तक-रूपाने संस्कृत भवितव्यम् तर्फे १९५४ साली प्रकाशित झाल्या आहेत.

कथालेखनाच्या तंत्रात जी क्रांति झालेली आहे ती या स्पर्धेसाठी आलेल्या सर्व संस्कृत कथामध्ये प्रतिबिंबित झालेली होती. अगदी रशियन पद्धतीच्या विचारसरणीचे प्रतिबिंब देखील काही कथामध्ये उमटलेले स्पष्ट दिसत होते. आधुनिक संस्कृत साहित्याचा विचार करताना एका व्यक्तीचा उल्लेख कोणालाहि टाळता येणार नाही. ही व्यक्ति म्हणजे कै. साहित्यचन्द्रिका पंडिता क्षमादेवी राव ! क्षमादेवींचे संस्कृत साहित्य क्षेत्रातील कर्तृत्व फार मोठे आहे. तो एका स्वतंत्र लेखाचा किंवा लेखमालेचा विषय आहे! १९३३ साली क्षमादेवींनी कथापञ्चकम् हा पद्यात्मक कथासंग्रह लिहिला. विषयाची आधुनिकता हे कथा-पंचकाचे वैशिष्टच. १९५४ साली त्यांचा 'ग्रामज्योतिः' नामक दुसरा पद्यात्मक कथासंग्रह प्रकाशात आला. रेवा, कटुविपाकः व वीरभा· या तीन सत्यकथा क्षमादेवींनी अनुष्टुभ् छंदात निवेदन केल्या आहेत. आपल्या या कथासंग्रहाला त्यांनी स्वतः 'काव्य' म्हटले आहे ते बरोबर नाही. क्षमादेवींचा सर्वात अधिक वैशिष्टचपूर्ण कथासंग्रह म्हणजे 'कथामुक्तावली'. विषय, आशय व तंत्र या सर्वच दृष्टींनी कथामुक्तावलीतील प्रत्येक कथा अगदी अद्ययावत् आहेत, मराठी-तील कोणत्याहि उत्कृष्ट कथालेखकाच्या कथाशी क्षमादेवींच्या कथामुक्तावली-तील कथांची तुलना करता येईल.

(पुढील मजकर पान ३८ वर)

विचारांचे विश्व

' साक्षी '

आधुनिक प्रगतिवाद

आधुनिक विज्ञानजन्य यंत्रयुगात 'प्रगति' व 'क्रांति' या शब्दांना जो भाव आला आहे तो, भारतातील जीवनोपयोगी वस्तूंच्या अखंड वाढत्या भावाप्रमाणे, सारखा वाढतच आहे. जीवनाचे असे एकहि क्षेत्र बाकी उरलेले नाही की ज्यातील घटनांचे मूल्यमापन 'प्रगति' वा 'क्रांति' या शब्दाच्या आधारे केले जात नाही. धर्मकारण, समाजकारण, राजकारण, शास्त्रकारण, साहित्य-कला-संस्कृति-कारण, इत्यादि जीवनाच्या सर्व क्षेत्रात 'प्रगति' व 'क्रांति' या शब्दांचा अनिर्बंध संचार होत असलेला दिसून येतो. जे जे प्रगतिकारक वा क्रांतिकारक ते तेच मोलाचे, अन्य सर्व प्रतिगामी व अर्थशून्य, असा समज वर्तमान जगात दृढमूल होऊन बसल्यासारखा दिसतो.

पण 'प्रगति' म्हणजे काय, 'क्रांति' म्हणजे काय, असा प्रश्न जर कोणी उपस्थित केला, तर त्याचे निश्चित उत्तर कोणाकडूनहि आपल्यास मिळत नाही. एवढेच काय, पण सर्वत्र रूढ होऊन बसलेल्या व आपल्यावरहि, कळत न कळत, प्रभाव पाडणाऱ्या या शब्दांना आपल्यापुरता आपल्या जीवनात काय अर्थ आहे, असा आपणच आपल्याला प्रश्न केला, तर अस्वस्थ करून टाकणाऱ्या गोंधळा-शिवाय आपल्या हाती दुसरे काहीहि लागत नाही. तरी पण या शब्दांची मोहिनी अपार आहे, हे जाणवल्याशिवाय राहात नाही.

प्रगति म्हणजे काय ?

प्रगति म्हणजे प्रकर्षेण गति. गति म्हणजे स्थलांतर. आणि स्थलांतराला काळ लागतो, म्हणून गति म्हणजे स्थलांतर व कालांतर. पण केवळ स्थलांतर व कालांतर झाले म्हणजे प्रगति झाली, असे म्हणता येत नाही. स्थिर वस्तूला गति दिली तर स्थलांतर व कालांतर घडून येते. पण स्थिर वस्तु केवळ गतिमान झाली, किंवा प्रकर्षेण गतिमान झाली तरी तिच्यात काही 'प्रगति' घडून आली असे म्हणता येत नाही. उंच मनोऱ्यावरून दगड खाली सोडला तर तो प्रकर्षेण

अनुक्रमणिका

वेगवान् होत होत खाली जमिनीवर येऊन आदळतो. तो मऊ जमिनीवर आदळला तर त्याच्यात कसलाच बदल घडून येत नाही. स्थलांतर व कालांतर त्याला घडले तरी त्याच्या अंगभूत गुणात कसलेहि परिवर्तन घडून येत नाही. दगडाचाच दृष्टांत माणसाला लावला तरी तोच प्रकार दृष्टीस पडतो. आगगाडी वा मोटर वा विमान यातून प्रवास करणाऱ्याला स्थलांतर व कालांतर यांचा अनुभव येतो, पण त्यामुळे त्या माणसाच्या अंगभूत गुणात परिवर्तन घडल्याचे दिसून येत नाही.

तरीपण रेल्वे, विमाने, उत्पादक व विध्वंसक यंत्रे, इत्यादि बाह्य साधनांची अधिकाधिक वाढ घडून येणे, या घटनेलाच 'प्रगति' हे नाव सामान्यत: दिले जाते. ज्या देशात यंत्रांचा वापर अधिक तो देश अधिक सुधारलेला, अधिक प्रगत, असे मानण्यात येते. यंत्रांच्या वाढत्या वापरामुळे वैयक्तिक व सामाजिक जीवनरीतीत परिवर्तन घडून येते, हे खरे आहे. म्हणून या परिवर्तनालाच 'प्रगति' वा सुधारणा असे म्हणण्याचा प्रघात पडला आहे.

पण हे परिवर्तन देखील बाह्य जीवनरीतीपुरतेच परिमित असते. कारण, त्यामुळे माणसे अधिक गुणवान्, चारित्र्यवान वा यथार्थज्ञानवान होतात, असाहि एक समज जो त्या परिवर्तनाशी जोडला जातो त्यात मात्र तथ्य नाही, असे जगांतील प्रमुख वैज्ञानिक व विचारवंतच आता म्हणू लागले आहेत. वस्तुस्थिति अशी आहे की, माणूस जितका बाह्य साधनावलंबी बनतो तितका तो मानवकल्याणकारी साध्यापासून दूर जातो.

मनुष्य अधिक सद्गुणी, अधिक शुद्ध चारित्र्याचा, अधिक यथार्थ ज्ञानी, अधिक परोपकारी, अधिक प्रेमळ व सर्वभूतहित साधण्यासाठी अधिकाधिक सर्जनशील होत जाणे, हेच मानवी कल्याणाच्या दृष्टीने प्रगतीचे लक्षण मानता येईल. पण आधुनिक यंत्रयुगाला हा निकष लावला तर आधुनिक मानव हा पूर्वीपेक्षा अधिक प्रगत झाला आहे, असे म्हणता येईल का? हा एक विचारणीय प्रश्न आहे.

खऱ्या प्रगतीचे स्वरूप

उपनिषदात एक मोठी अर्थपूर्ण प्रार्थना आहे.

"असतो मा सद्गमय
तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्योर्मा अमृतं गमय"

या प्रार्थनेत असताकडून सताकडे जाणे, काळोखातून निघून प्रकाशाकडे जाणे आणि मृत्यूकडून अमृताकडे जाणे, अशा स्वरूपाच्या गमनक्रियेचा जो उल्लेख

आहे, तोच मानवी प्रगतीची खरी दिशा दाखवितो असे, मानवाचा सद्‌गुणविकास, ज्ञानविकास आणि अखंड आनंदमय अमृतत्व, ही आद्य व अंतिम जीवनमूल्ये मानल्यास, म्हणता येते.

परंतु ही जी गमनक्रिया वरील अर्थपूर्ण वैदिक प्रार्थनेत दिग्दर्शित झाली आहे ती क्रिया बाह्य देशात घडून येणारी नसून माणसाच्या अंतःकरणातच घडून येणारी आहे, हे स्पष्ट आहे. हिलाच उन्नयन, वर वर जाणे, प्रगतिशील होणे, असे म्हणता येते. दगड उंचावरून खाली सोडला असता जी अधिकाधिक वेगवानता त्याला प्राप्त होते, तिला जसे अधःपतन असे सार्थतेने म्हणता येते, तसेच जडयंत्रानुगामी बाह्य जीवनप्रकारात परिवर्तन घडून येणे, हेहि एक प्रकारचे अधःपतनच आहे, असे तितक्याच सार्थतेने म्हणता येते.

पण ही केवळ म्हणण्याची गोष्ट नसून वस्तुस्थितीहि तशीच आहे, असे आधुनिक विज्ञानाच्या नवनवीन शोधांच्या आधारेच सिद्ध करता येते. जडानुगामी बुद्धि ही केवळ व्यावहारिक व उपयुक्ततावादीच कशी असते, ही गोष्ट सुप्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ बर्गसाँ याने आपल्या Creative Evolution आणि इतर ग्रंथात, भरीव युक्तिवाद व जीवशास्त्रातील भक्कम पुरावा, यांच्या आधारे या शतकाच्या आरंभीच सिद्ध केली होती. पण बर्गसाँचा वैज्ञानिकांवर व विचारवंतांवर पडलेला प्रभाव मात्र फारच अल्पजीवी ठरला. पण अलीकडे अणुविज्ञानात जी नवी भर पडली आहे तिचे स्वरूप इतके क्रांतिकारी आहे, की जगप्रसिद्ध फ्रेंच अणुवैज्ञानिक, द ब्रॉग्ली, याने 'Physics and Microphysics' या आपल्या ग्रंथात, बर्गसाँच्या तत्त्वनिष्ठ प्रतिभेला जे प्रयोगाशिवायच दिसले तेच आता नव्या प्रयोगांनीहि कसे सिद्ध झाले आहे, हे दाखविले आहे. जिज्ञासूंनी द ब्रॉग्लीचा हा ग्रंथ आणि एडिंग्टन, सर जेम्स जीन्स, आइन्स्टीन, इत्यादि जगप्रसिद्ध वैज्ञानिकांचे ग्रंथ अवश्य अभ्यासावे, अशी माझी आग्रहाची सूचना आहे.

आधुनिक विज्ञानाच्या यथार्थ स्वरूपाबद्दल साऱ्या जगभर आणि विशेषतः आपल्या या दुर्दैवी देशात इतके भयानक गैरसमज दृढमूल होऊन बसले आहेत की ते पाहून हसावे की रडावे, तेच कळेनासे होते. अणुविज्ञानातील नव्या शोधामुळे वस्तूंची जडता व तीवर आधारलेल्या सर्व जडवादी विचारप्रणाल्या यांचा कसा चक्काचूर झाला आहे, याची यंत्रवेड्या व प्रगतिवेड्या पुढाऱ्यांना अद्याप वार्तादेखील लागल्याचे दिसून येत नाही. आणि लागली असली तरी जडवादी प्रगतीच्या मोहजालातून बाहेर पडणे म्हणजे आपल्या पुढारीपणावरच गंडांतर ओढवून घेणे होय, हे त्यांच्या व्यावहारिक, उपयुक्ततावादी जडबुद्धीला स्पष्ट दिसत असल्यामुळे, त्याची जाणीव जगाला करून देणे, हे त्यांना परवडण्यासारखे

अनुक्रमणिका

नाही. आणि म्हणूनच यंत्राधिष्ठित औद्योगिक प्रगतीचे नगारे वडविण्याचा धूमधडाका आपल्या देशातहि सुरू आहे व त्यापायी अब्जावधी रुपयांचा चुराडा चालू आहे.

माणसाचे कष्ट व दुःख कमी करण्यासाठी यंत्रांचा होईल तेवढा उपयोग करण्यास कोणीहि सूज्ञ माणुस विरोध करणार नाही. पण यंत्राधिष्ठित जडवादी दृष्टि व जडानुगामी आंधळा प्रगतिवाद यांच्या आहारी जाणे, हे किती भयानक आहे, याची आता सर्व सुशिक्षितांनी तरी जाणीव करून घेतली पाहिजे. आणि हीच दृष्टि व हाच प्रगतिवाद पराकोटीला नेऊन क्रांतीचा कोलाहल करणारे समाजवादी व कॉम्युनिस्ट हे वैज्ञानिक वा अन्य कोणत्याहि सत्याचे व परिणामतः समग्र मानवजातीच्या कल्याणाचे कसे वैरी झाले आहेत, हेहि आता सर्वांनी स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे.

नवीन वैज्ञानिक शोधांचे स्वरूप

नवीन वैज्ञानिक शोधातून वैज्ञानिकांनीच काढलेले निष्कर्ष साररूपाने येणेप्रमाणे आहेत:—

(१) मॅटर (जडवस्तु) आणि रेडिएशन (किरणोत्सर्ग) यांच्याहून सर्वस्वी भिन्न पण अद्याप अज्ञात, असे अव्यक्त सूक्ष्म तत्त्व दृश्य विश्वाच्या मुळाशी आहे.

(२) बाह्येंद्रियांनी माणसाला जे ज्ञान होते, ते केवळ आभासरूप (appearance) असते. वास्तवता (Reality) म्हणजे काय, हे आधुनिक विज्ञानाला अद्याप कळू शकले नाही. आभासांनाच वास्तवता मानण्याचा प्रमाद विज्ञानाने आजवर केला आहे.

(३) जड वस्तूंचे पृथक्करण करता करता सरतेशेवटी तिची जडताच संपुष्टात येते; एवढेच नव्हे, तर तिच्याशी संलग्न मानले गेलेले दिक्कालहि अव्यक्तात विलीन होतात, असे प्रयोगांवरून म्हणावे लागते. सारांश, दिक्, काल व दृश्य जडवस्तु यांचे यथार्थ स्वरूप कसे आहे, याबाबत आधुनिक विज्ञान आता बुचकळ्यात पडले आहे.

दृश्य, स्थूल, जड विश्वाचा शोध घेणारे आधुनिक विज्ञान अदृश्य अव्यक्ताच्या उंबरठ्यापाशी येऊन ठेपले आहेत. या अव्यक्ताच्या गुहेतच विश्वाचे रहस्य साठले असावे, असे आता स्पष्ट होऊ लागले आहे. पण या गुहेत कसे शिरावे, हे अद्याप तरी वैज्ञानिकांना कळलेले नाही. तरीपण काल तत्त्व व चेतन तत्त्व यांचा

अनुक्रमणिका

वेध घेता आल्यास विश्वदृष्टीवर नवा प्रकाश पडेल, असे मान्य करण्यापर्यंत वैज्ञानिकांनी मजल मारली आहे.

वैदिक विश्वदर्शन

आधुनिक विज्ञानाने जेथे हात टेकले आहेत, तेथूनच वैदिक दर्शनशास्त्रांनी आपल्या विश्व–विवेचनाला आरंभ केला आहे. व्यक्त, अव्यक्त आणि ज्ञ (चेतनपुरुष) या तीन प्रमुख प्रमेयांच्या आधारावर सांख्य दर्शनाने सर्गप्रक्रिया प्रमाणशुद्ध रीतीने सिद्ध केली आहे. ही सर्गप्रक्रिया बुद्धिग्राह्य असल्यामुळे ती समजून घेण्यावर व आत्मसात करण्यावरच मानवाचे भवितव्य कसे अवलंबून आहे, हेहि सांख्यदर्शनांत नमूद केले आहे. स्वरूपदर्शन (आत्मदर्शन) आणि विश्वदर्शन यांचा संबंध हा प्रकृतिसिद्धच कसा आहे, हे या दर्शनशास्त्रावरून स्पष्ट होते.

योगदर्शनांत द्रष्टा व दृश्य यांचे परस्परसंबंध यौगिक प्रयोगनिष्ठ प्रक्रियेने कसे सिद्ध होतात आणि सांख्यप्रणीत सर्गाचा साक्षात्कार करून घेण्यासाठी काय केले पाहिजे, हे शास्त्रशुद्ध व प्रयोगप्रधान रीतीने वर्णिले आहे. आणि वेदान्त दर्शनांत इतर सर्व दर्शनांचा शास्त्रशुद्ध रीतीने समन्वय करण्यांत आला आहे.

सारांश, प्रगतीची दिशा बाह्य दृश्य विश्वाकडे ओढ घेण्यात नसून, आत्मतत्त्व संशोधनातच प्रगतीचे रहस्य कसे साठले आहे, ही गोष्ट वैदिक दर्शन शास्त्रांनी, सूक्ष्म व निर्दोष युक्तिवाद आणि यौगिक साक्षात्कार–प्रक्रिया यांच्या आधारे सिद्ध केली आहे. एवढेच नव्हे, तर आदिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशा तीन्ही क्षेत्रांवर विजय मिळवू शकणारा वैश्विक पुरुषार्थवादहि त्यांनी भक्कम तात्त्विक अधिष्ठानावर प्रस्थापित केला आहे. ही पुरुषार्थसिद्धि प्राप्त करून घेण्यासाठी सतत प्रयत्नशील होणे आणि या पुरुषार्थांना उपकारक होईल अशी समाजरचना आकारास आणणे, हीच मानवी प्रगतीची खरी दिशा आहे. प्रगतीच्या इतर सर्व कल्पना भ्रामक व आत्मनाशाकडे नेणाऱ्या आहेत, ही गोष्ट वैदिक दर्शनशास्त्रें आत्मसात केल्याशिवाय आधुनिक जगाला पटणार नाही; आणि हे पटवून घेण्याचा प्रयत्नहि न करता 'प्रगति', 'क्रांति' या शब्दांची पोपटपंची करीत राहणे, ही एक भयानक व उपद्व्यापी बालिशता आहे, याची साक्षहि पटणार नाही.

卐

अनुक्रमणिका

साहित्य–समीक्षा

अपमानित

समीक्षक : प्रा. भवानीशंकर पंडित

'अपमानित' हा श्री. सौ. इंदुमती शेवडे यांचा दुसरा लघुकथासंग्रह आहे. तेव्हा लघुकथालेखनाच्या त्या अनोळख्या किंवा नवख्या नाहीत. नागपुरात एक सुशिक्षित व कलानिपुण कार्यकर्त्या म्हणून त्यांची ख्याति आहे. त्यांच्या या कथासंग्रहाची समीक्षा करण्याचे वस्तुत: काही प्रयोजन नाही किंवा माझा तसा अधिकारहि नाही. परंतु सहज हाती पडलेल्या या संग्रहातील कथा वाचून माझ्या मनात जे दोनचार विचार उद्भवले, ते 'युगवाणी'च्या माझ्या वाचकमित्रांना कळावेत म्हणून हा प्रयत्न आहे.

या कथासंग्रहातील कथा एकाच लेखणीतून बाहेर पडल्या आहेत. परंतु त्यांचे स्वरूप एखाद्या अष्टदल कमलाप्रमाणे एकसंघ नाही. एकाच बगीच्यातील एखाद्या फुलझाडांच्या फुलांचा गुलदस्ता कुशलतेने गुंफावा आणि रसिकांच्या नजरेला तो पडेल अशा रीतीने फुलदाणीत ठेवावा त्याप्रमाणे त्याचे स्वरूप आहे. ललितलेखन हे त्याच्या निर्मात्याच्या अनुभूतीतून आणि चिंतनातून उत्स्फूर्त होत असते. याचा अर्थ असा नाही की त्यात त्याचे स्वत:चे व्यक्तिगत जीवन असते. त्यात जीवनाच्या फुलातील अर्काचा किंचित् अंश असतो. परंतु त्याचे साधारणीकरण झालेले असते. आणि तो अर्क एखाद्या पेयात शर्करेबरोबर अशा तऱ्हेने मिसळलेला व घोळलेला असतो की त्या पेयाचा आस्वाद घेताना रसिक त्या पेयातील अंशात्मक अर्काची, त्या अर्काच्या फुलाची, त्या फुलाच्या झाडाची किंवा ते झाड ज्या माळ्याने लावले त्याची चर्चा करीत नाही. तो त्या पेयापासून प्राप्त होणाऱ्या निर्विकल्प आनंदात व अनिर्वचनीय तृप्तीत तल्लीन असतो.

प्रस्तुत संग्रहातील 'अपमानित' या कथेतील सीता 'कसलीशी एक पुडी' खाण्याचे दिव्य करते. ते तिने केले नसते आणि आपल्या दिराजावांच्या संसारात सुख मानले असते व रामचंद्राच्या पुनरागमनानंतरहि स्वत:च्या कर्तव्यनिष्ठेत खंड पडू दिला नसता, तर मला वाटते, कथालेखिकेने 'त्यागा'ला साकार केले असते. त्याचप्रमाणे '**एक राम**' या कथेतील 'उंचपुरा, ठसठशीत, सावळा, मोठ्या कपाळाचा आणि लांब नाकाचा' कथालेखक आणि त्याच्या 'लघुकथावर

बेफाम लट्टू' झालेली कथेतील विवाहित कथालेखिका रात्र पडल्यावर एकमेकांना निरोप देताना दिसले असते, तर 'संयम' व 'मर्यादा' यांचे मूर्तिमंत दर्शन घडले असते. वाचक जी कथा वाचतो ती व्यक्तिरेखेसाठी किंवा विरंगुळचासाठी वाचत नाही. त्याला 'व्यक्ति'पेक्षा तिच्या आत दडलेले 'विभूतिमत्त्व' प्रिय व आदरणीय वाटत असते. त्या विभूतिमत्त्वाचा आविष्कार करण्यातच कथाकाराचे कलासर्वस्व आहे. साऱ्याच व्यक्ति हाडामासाच्या आणि रक्ताच्या आहेत. त्यांचे दर्शन तर क्षणोक्षणी व पावलोपावली घडत असते. परंतु वाचकाला जीवनाचे दर्शन हवे असते. कारण ते सत्य, शिव व सुंदर असते. म्हणूनच प्रस्तुत कथात सीतेचा 'त्याग', कथाकाराचा 'संयम' आणि 'त्याच्या लघुकथावर लट्टू झालेल्या' विवाहित कथालेखिकेची 'मर्यादा' यांच्या दर्शनाची अपेक्षा अतृप्त राहते.

परंतु कथालेखन म्हणजे काही केवळ जीवनदर्शन नाही. जीवनदर्शन हा कथेचा 'आत्मा' मानला, तर कथावस्तु व तिचे प्रसाधन यांना 'शरीर' मानावे लागेल. आणि शरीर नसेल, तर आत्म्याचा प्रत्यय पटेल कसा? मोठ्या सौभाग्याची गोष्ट आहे की हे दोन्ही गुण या कथासंग्रहात वैपुल्याने आढळतात. या कथासंग्रहात एकूण आठ कथा आहेत परंतु त्या एकसुरी नाहीत हे विशेष आहे. '**भाऊ-भाऊ**' व '**कुत्रीची पिल्लं**' या कथांचा सूर करुण आहे, तर '**वदामराणी**' व '**उपाध्याय सासरी पळाला**' या कथाचा सूर हास्यप्रचुर आहे. मानवी जीवनात वास्तविक करुण व हास्य हेच दोन रस आहेत. हे दोन रस म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्या, तरी त्या दोन आहेत हे नाकारता येत नाही. मनुष्य हा कित्येकदा एकाच वेळी रडत असतो; तो रडता रडता हसतो व हसता हसता रडतो. त्याच्या डोळचातून एकदा तप्त अश्रू ओघळतात, तर दुसऱ्यांदा शीत अश्रू वाहू लागतात. त्याची दृष्टि एक असते, पण डोळे दोन असतात. आणि त्या डोळचांचे महत्त्व सारखेच असते. या कथासंग्रहाच्या कथालेखिकेने हे तत्त्व ओळखले आहे. म्हणूनच एकाच उपरोधाचा आश्रय करून तिने 'कुत्रीची पिल्लं' या कथेत डोळचांना पाणी आणण्यास लावले आहे, तर 'उपाध्याय सासरी पळाला' या कथेत ओठांना विलग व्हावयास लावले आहे. 'भाऊ-भाऊ' या कथेत उदार व दिलदार मातृत्वाचे करुण दर्शन आहे, तर 'वदामराणी'त पुरुषाच्या दुहेरी जीवनाचे मार्मिक व सूचक प्रदर्शन आहे. ते पाहताना पांडेजींच्या बेमालूम सोंगाढोंगाचे त्यांच्या घरवालीच्या भोळचाभाबडेपणाचे हसू आल्यावाचून राहात नाही.

'**जिजीविषा**' व '**छाया-प्रकाश**' या कथात मनोविज्ञानाचे अवलंबन करण्यात आले आहे. परंतु त्यांचा तपशील व अतिरेक त्या कथांना मारक झाला आहे. त्यापेक्षा 'कुत्रीची पिल्लं' या कथेतील सुलूचे मनोलेखन कुठेहि विश्लेषण न

अनुक्रमणिका

करता अधिक सूचक व सुंदर झाले आहे. 'कुत्रीची पिल्लं' ही कथा वाचतांना मला छिदवाडचाचे कथालेखक प्रभाकर शांताराम मांजरेकर यांच्या 'नवे कुत्रे' या मनोवैज्ञानिक व कलात्मक कथेची वारंवार आठवण आली. प्रस्तुत कथासंग्रहातील सुलूचे मनोलेखन चंपीच्या आनुषंगिक कथेने ध्वनित झाल्यामुळे विशेष सरस झाले आहे. अलिकडे कथांत मनोविज्ञानाचे नसते स्तोम माजविण्यांत येत असते. कथालेखन ही वस्तुतः एक कला आहे. आणि संश्लेषण हे कलेचे कार्य आहे. परंतु कित्येकदा हे तत्त्व दृष्टिआड होते. आणि कथेला फ्राइड, युंग किंवा अॅडलर याच्या भाषांतरित मनोवैज्ञानिक लेखांची कळा येते. 'कुत्रीची पिल्लं' या कथेत लेखिकेला कळत नकळत 'कुटुंबनियोजना'चा सद्यः प्रश्न डोकावला आहे. प्रसूति हा निसर्ग आहे. स्त्रीला वारंवार प्रसूति झाल्यामुळे मृत्यु येतो हा वैद्यकाच्या दृष्टीने अपसमज आहे. तिला मृत्यू येण्याचे कारण एकादा रोग असतो. प्रसूति नसते. प्रस्तुत कथेत कथालेखिकेने मनोविश्लेषण व मतप्रचार या दोन्ही गोष्टींना टाळा दिल्यामुळे तिचे स्वरूप शुद्ध कलात्मक व आनंदमय झाले आहे.

सौ. शेवडे यांची भाषा शुद्ध मराठीच आहे. परंतु तिच्यावर सागरच्या बोलीचे संस्कार आहेत. ते स्वाभाविक आहेत. लेखन हे शुद्ध किंवा अशुद्ध असते. भाषा ही कधीच अशुद्ध नसते. ती दहा दहा कोसावर वदलते. तिच्यात नित्य परिवर्तन होत असते. परंतु आपण ज्या ठिकाणचे नाणे प्रचारांत आहे, त्याच ठिकाणच्या तेवढ्या भाषेला शुद्ध मानून चालत असतो. वस्तुतः प्रत्येक ठिकाणची नाणी ही खरी असतात व त्या त्या ठिकाणी ती प्रचारात असतात. मराठीचे जे रूप सागर–दमोहच्या बाजूला चालू आहे त्याची झाक या कथासंग्रहाच्या भाषेत दृष्टीस पडते. या कथासंग्रहातील नयना 'लाजून' बोलावयाचे ते 'शरमून' बोलते, सीताहि देवाकडे 'पाठ फिरवायची' ती 'पाठ फेरते', निनाद हा काकूंना 'पंख्याने वारा घालण्याला' सांगण्याऐवजी 'असा इथून पंखा करा' म्हणून सांगतो आणि 'एका रात्री'तील नायक हा नायिकेला 'मस्त खाना' देण्याबद्दल 'मस्त खाना खिलवतो.' मला वाटते भाषिकांच्या हेव्यादाव्याच्या या युगात दुसऱ्याच्या भाषेला रांगडी किंवा हेंगाडी म्हणून हिणविण्यापेक्षा जर साहित्यिक अन्य भाषाभगिनींच्या भंडारातील कांही रत्ने प्रेमाने मिळवितील व आपल्या भाषेला संपन्न व समृद्ध करतील, तर तिचे न्यून व दारिद्र्य दूर होईल. या कथासंग्रहात Bolt साठी 'चटकनी' ध्वन्यनुकारी अन्वर्थक शब्द आला आहे, इंग्रजीतील Continuous काळाप्रमाणे 'त्याची बायको काळजी करीत राहिली' हा अर्थपूर्ण अपूर्ण भूतकालाचा प्रयोग आला आहे आणि 'मन बसणे' या अर्थी 'लट्टू होणे' हा वाक्प्रचार आला आहे. या वाक्प्रचारात किती मोठा अर्थ आला आहे. 'लट्टू' म्हणजे 'भोवरा'. तो जसा बेभानपणे आपल्याच नादांत गोलगोल

फिरत असतो त्याप्रमाणे एखाद्या तरुणीच्या भोंवती एखादा तरुण गोंडा घोळू लागला म्हणजे तो तिच्यावर 'लट्टू' आहे असें म्हणतात किंवा त्या तरुणाला 'लट्टू प्रसाद' असे नाव देतात. बायकोच्या मुठीत राहणाऱ्या बाईलवेड्याला हिंदीत 'मियामिठ्ठू और हो गए लट्टू' असे म्हणतात. 'मिट्ठू' म्हणजे 'पोपट' तो जसा दिलेले खातो व सांगितलेले बोलतो तसा जो पुरुष घरात स्त्रीच्या आज्ञेत राहत असल्यास त्यास 'मिट्ठू' म्हणून चिडवितात. मराठी भाषेत एकहि व्यापारी म्हण नाही. 'आज नगद कल उधार', 'एक पंथ दो काज', 'आमके आम और गुटलियोंके दाम', 'चमडी जाय मगर दमडी न जाय', 'जेनू काम तेनूं थाय, बीजो करे सो गोतो खाव.' इत्यादि म्हणी हिंदी व गुजराती आहेत. पैश्याप्रमाणेच व्यापारी व्यवहारी परिभाषेतहि आम्ही दरिद्री आहोत. ग्रंथसंग्रहाच्या लेखिकेने नकळत का होईना, काही अन्वर्थक शब्द मराठीत आणले याबद्दल तिचे अभिनंदन आवश्यक आहे.

सौ. इंदुमती शेवडे यांच्या हातून मराठी कथासाहित्यात उत्तरोत्तर अधिकाधिक उच्च अभिरुचीच्या कथांची भर पडो हीच अपेक्षा आहे.

[अपमानित—लघुकथासंग्रह-लेखिका : सौ. इंदुमती शेवडे; प्रकाशक : प्रदीप मुद्रणालय, धनतोली, नागपूर; मूल्य २ रु. पृष्ठसंख्या १००]

卐

(पान २९ वरून)

मराठी, गुजराती, कन्नड, इंग्रजी, फ्रेंच इत्यादि अनेक भाषांवर पराकाष्ठेचे प्रभुत्व असून क्षमादेवींनी संस्कृत भाषेतून प्रामुख्याने साहित्यसेवा केली व त्या सेवेच्या द्वारे आधुनिक संस्कृत साहित्याच्या इतिहासात त्यांनी आपली कीर्ति अजरामर केली. संस्कृतची सेवा ही देशाची व संस्कृतीची उत्कृष्ट सेवा होय, ही क्षमादेवींची धारणा होती व म्हणूनच त्यांनी आपल्या भावना व विचारांच्या अभिव्यक्तीसाठी इतर भाषीय माध्यमाचा त्याग करून संस्कृतचा अंगीकार ला होता !

संपादक महाशयांनी घातलेल्या लेखमर्यादेचा विचार करता यापेक्षा प्रस्तुत वषयावर या लेखात अधिक लिहिणे अशक्य आहे. संस्कृत साहित्याची गुप्त सरस्वती आजहि कशी खळखळा वाहत आहे याची कल्पना येण्यास प्रस्तुत लेखातील त्रोटक माहिती पुरेशी होईल अशी आशा आहे.

卐

साभार पोच

१. **१८५७ च्या वीर महिला**—लेखक : ह. वा. देशपांडे; प्रकाशक, ठाकूर आणि कंपनी लि., अमरावती; मूल्य ४ रुपये.

२. **स्वप्नमालिकेतील मुलीशी लग्न व इतर खऱ्या घटना**—लेखक : राजाराम सखाराम भागवत व शरच्चंद्र कृष्ण गोखले; प्रकाशक : चिटणीस, मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन, ७ गणेशवाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४; मूल्य १ रु. ५० न. पै.

३. **उद्धव**—लेखक : मंगेश पदकी; प्रकाशक : महाराष्ट्र प्रकाशन, अमरावती; मूल्य २ रुपये.

४. **मराठ्यांचे सिंहासन्**—लेखक : गो. कृ. मुंगशीकर; प्रकाशक : महाराष्ट्र प्रकाशन, अमरावती; मूल्य २ रुपये

५. **मामा फडणवीस दादाभाई नौरोजी**—लेखक : पद्माकर डावरे; प्रकाशक : मजेस्टिक बुकस्टॉल, गिरगाव नाका, मुंबई ४; मूल्य २ रुपये.

६. **पुष्कळा**—लेखक : पु. शि. रेगे; प्रकाशक पॉप्युलर प्रकाशन, लॅमिंग्टन रोड, मुंबई ७; मूल्य ३ रु.

७. **वाटचाल**—लेखक : न. रा. धुळधर; प्रकाशक : प्र. न. धुळधर, वुटी रोड, सीतावर्डी, नागपूर १; मूल्य ३ रु.

८. **तळमळ**—लेखक : गोविंद नन्नोरे; प्रकाशक : शशि प्रकाशन, धामणगाव; मूल्य १ रु. २५ न. पै.

९. **स्वप्नींचे हे धन**—लेखक : शं. गो. साठे; प्रकाशक : पॉप्युलर प्रकाशन, लॅमिंग्टन रोड, मुंबई ७; मूल्य २ रु.

१०. **जयकेतु**—लेखक : सदानंद रेगे; प्रकाशक : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ७; मूल्य ५ रु.

११. **बालानंद**—लेखक : मनोहर दिनकर टेकाडे; प्रकाशक : पूजा प्रकाशन, धंतोली, नागपूर १; मूल्य ५० न. पै.

१२. **भारत संशोधक मंडळाचे त्रैमासिक**—प्रकाशक : चिटणीस, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें.

अनुक्रमणिका

१३. **जीवन-सागर**—लेखक : श्री. भि. वेलणकर; प्रकाशक : कार्यवाह, ब्राह्मणसभा, प्रार्थनासमाज, गिरगाव, मुंबई ४; मूल्य १ रु. ५० न. पै.

१४. **कोल्होबाची करामत**—लेखक : व. कृ. वऱ्हाडपांडे; प्रकाशक : नागविदर्भ प्रकाशन, बालाजी प्लॉट्स अमरावती; मूल्य १ रु.

१५. **अशोकाची फुले**—लेखक : द. ग. प्रधान; प्रकाशक : नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर १; मूल्य ६२ न. पै.

१६. **जमिनीवरची माणसं**—लेखक : शान्ताराम; प्रकाशक : महाराष्ट्र प्रकाशन, अमरावती; मूल्य ३ रु. ५० न. पै.

१७. **आहुती**—लेखक : पु. य. देशपांडे; प्रकाशक : नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर १; मूल्य ४ रु.

१८. **पुष्पमहाल**—लेखक : आकाशानंद; प्रकाशक : नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर १; मूल्य ६२ न. पै.

१९. **पंचमहाल**—लेखक : वि. वा. जोशी; प्रकाशक : नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर १; मूल्य ९० न. पै.

२०. **आम्ही भागीरथाचे पुत्र**—लेखक : गो. नी. दाण्डेकर; प्रकाशक : महाराष्ट्र प्रकाशन, अमरावती मूल्य १० रु.

२१. **अनामिका**—लेखक : अरविंद गोखले; प्रकाशक : पॉप्युलर बुकडेपो, मुंबई ७; मूल्य ५ रु.

२२. **वाङ्मयीन दृष्टि आणि दृष्टिकोन**—लेखक : वा. ल. कुळकर्णी; प्रकाशक : पॉप्युलर बुकडेपो मुंबई ७; मूल्य ५ रु.

卐

अनुक्रमणिका

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस वि. सा. संघ, याजकडून

सत्कार

१. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचा सत्कार

नागपूर विद्यापीठाची डी. लिट्. पदवी आणि साहित्य अकादमीचे मराठीचे पारितोषिक हे दोन्हीहि बहुमान प्राप्त केल्याबद्दल विदर्भातील सुप्रसिद्ध साहित्यिक आणि संस्कृतज्ञ प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचा सत्कार विदर्भ साहित्य संघातर्फे गुरुवार दि. ३ मार्च १९६० रोजी सायंकाळी ६–३० वाजता वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात करण्यात आला. या वेळी सरचिटणीस श्री. श्री. गो. काशीकर यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर श्री. भाऊसाहेब माडखोलकर, श्री. पु. य. देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते व डॉ. य. खु. देशपांडे यांची भाषणे झाली. नंतर संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी डॉ. देशपांडे यांना श्रीफळ व शाल अर्पण करून त्यांचा सत्कार केला. त्यानंतर डॉ. देशपांडे यांनी उत्तरादाखल भाषण केले. शेवटी चिटणीस श्री. य. गो. मालोदे यांनी सर्वांचे आभार मानले.

२. श्री. अप्रबुद्ध (पाळेकर) यांचा सत्कार

नागपुरातील एक थोर तपस्वी, विद्वान व साक्षात्कारी पंडित श्री. अप्रबुद्ध तथा अण्णासाहेब पाळेकर यांचा दि. १०–३–६० रोजी सायंकाळी ६–३० वा. विदर्भ साहित्य संघात सत्कार करण्यात आला. वैदिकमंत्रांच्या आशीर्वादपर उद्घोषाने कार्यक्रमाला सुरवात झाली. त्यानंतर वि. सा. संघाचे चिटणीस श्री. य. गो. मालोदे यांनी प्रास्ताविक भाषण केले व कार्यक्रमाला आलेले संदेश वाचून दाखविले. नंतर माजी न्यायाधीश श्री. भवानीशंकर नियोगी, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास व प्रा. श्री. भा. वर्णेकर यांनी भाषणे करून श्री. अप्रबुद्धांच्या जीवनाची व साहित्याची थोरवी विशद केली. त्यानंतर संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी श्री. अप्रबुद्धांच्या गौरवपर भाषण केले व त्यांना पुष्पमाला आणि श्रीफल समर्पण केले. ह्याच वेळी नागपुरातील विविध संस्थातर्फे श्री. अप्रबुद्धांना हार समर्पण करण्यात आले. उत्तरादाखल

केलेल्या भाषणात श्री. अप्रबुद्धांनी आपली तत्त्वदृष्टि व्यक्त केली. शेवटी वि. सा. संघाचे दुसरे चिटणीस प्रा. भा. ल. भांवूरकर यांनी सर्वांचे आभार मानल्यावर वंदेमातरम् होऊन कार्यक्रम समाप्त झाला. अस्पृश्य म्हणविल्या जाणाऱ्या समाजातील व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली व त्यांच्या हाताने कट्टर सनातनी म्हणविल्या जाणाऱ्या व्यक्तीचा झालेला हा सत्कार अनेक दृष्टींनी अत्यंत हृदयंगम, उदात्त व उद्बोधक झाला.

* *

भेट

१. मध्यप्रदेशाचे राज्यपाल माननीय श्री. हृ. वि. पाटसकर यांनी दि. ८ मार्च ६० रोजी सायं. ५-३० वाजता वि. सा. संघाला भेट दिली. या वेळी त्यांना साहित्य मंदिर आणि धनवटे रंगमंदिर दाखविण्यात आले. यानंतर कै. गडकरी सभागृहात चहापानांचा कार्यक्रम झाला. ह्या प्रसंगी माननीय राज्यपालांनी छोटेसे भाषण केले व वि. सा. संघाच्या कार्याबद्दल प्रशंसोद्गार काढले.

२. सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. गो. नी. दांडेकर यांनी दि. २२ मार्च ६० रोजी वि. सा. संघाला भेट दिली. या वेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी त्यांना साहित्यमंदिर आणि रंगमंदिर दाखविले.

* *

गोंदिया शाखा

भवभूति-स्मारकांतर्गत रंगमंदिराचा कोनशिला समारंभ

वि. सा. संघाच्या गोंदिया शाखेच्या विद्यमाने मंगळवार दि. १५ मार्च ६० रोजी सायंकाळी ५-१५ वाजता सागरचे उद्योगपति श्रीमान चिंतामणराव पिपळापुरे यांचे हस्ते भवभूति-स्मारकांतर्गत रंगमंदिराचा कोनशिला समारंभ अत्यंत थाटाने करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन गोंदिया येथील उद्योगपति श्री. मनोहरभाई पटेल यांनी देणगी म्हणून दिलेल्या विदर्भ साहित्य संघाच्या जागेत भव्य शामियाना उभारून करण्यात आले होते.

वि. सा. संघाचे संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे आणि युगवाणीचे संपादक श्री. पु. य. देशपांडे हे या समारंभासाठी नागपूरहून आले होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला स्वागतगीत झाल्यानंतर श्री. ना. ह. तेलंग यांनी गोंदिया शाखेचा अहवाल वाचून दाखवून मुंबई शासनाने पंचेवीस हजार रुपयांचे अनुदान देण्याचे आश्वासन दिल्याचे सांगितले व त्या अनुदानापैकी पहिला हप्ता समारंभाच्या दिवशीच मिळाल्याचे जाहीर केले.

वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी समारंभाच्या मुख्य पाहुण्यांचे स्वागत करून त्यांच्या औदार्याबद्दल गौरवपर उद्गार काढले. यानंतर श्रीमान् पिपळापुरे यांनी समारंभाच्या उपक्रमाविषयी आपले विचार व्यक्त करून, नाटचगृह पूर्ण व्हावे, अशी सदीच्छा व्यक्त केली व आवश्यक ती सर्व मदत देण्याचे आश्वासन दिले.

यानंतर मुख्य पाहुण्यांचे हस्ते विधिपूर्वक कोनशिला बसविण्यात आली. यानंतर श्री. बाळासाहेब ढवळे यांनी १९४८ सालापासून भवभूति स्मारकाविषयी कोणकोणते प्रयत्न करण्यात आले, याचा साद्यंत इतिहास सांगितला. नंतर श्री. पु. य. देशपांडे यांनी आपल्या भाषणात कवि भवभूतिबद्दल माहिती सांगून त्याच्या स्मारकाचे औचित्य विशद केले.

शेवटी 'वंदेमातरम्' होऊन कार्यक्रम समाप्त झाला. ह्या कार्यक्रमाला गोंदियातील सुविद्य नागरिक हजारोंच्या संख्येत उपस्थित होते. रात्री श्रीमान् छोटुसाभाई क्षत्रिय, अध्यक्ष गोंदिया शाखा यांनी सन्माननीय पाहुणे आणि इतर गोंदियानिवासी कार्यकर्ते यांना उत्कृष्ट मेजवानी दिली.

卐

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने

पुस्तके	रु. पैसे
★१ निबंध परिमल	२–२५
२ सुमन संचय	१–२५
*३ मराठी गद्य ..	१–५०
*४ अंमलदार (नाटक) पु. ल. देशपांडे	२–००
५ भारती (नाटक) नाना जोग ...	१–५०
६ हिंदी मराठी भाषा प्रवेशिका—मालती बाई श्रीखंडे	०–७५
७ कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेख संग्रह भाग २ ...	३–००
८ The Vedasthana or The Ancient Home of the Indo-Aryans-(पूर्ण ग्रंथ) ले. कै. डॉ. तु. ज. केदार	३–००
९ ,, ,, ,, (केवळ भाग ४)	१–५०
१० डॉ. केदार यांचे चरित्र —ले. ज. रा. जोशी	५–००
११ नाट्यमहोत्सव विशेषांक	३–००

कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध

१२ वाग्वैजयंतीचे पुनर्मूल्यन	—डॉ. मा. गो. देशमुख	०–३१
१३ नाटककार गडकरी	—द. रा. गोमकाळे	०–३१
१४ गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार–कविभूषण	प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०–५०
१५ गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	—प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
१६ सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	—द. वि. तेंडूलकर	०–५०
१७ गडकऱ्यांची खरी भूमिका	—प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
१८ गडकऱ्यांची नाट्यशैली	—प्रा. रू. पा. पांजणकर	०–५०
१९ "युगवाणी मासिक" —वार्षिक वर्गणी रु. ५	(वि. सा. संघाचे मुखपत्र)	

★ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार नागपूर प्रकाशन, नागपूर यांचेकडे आहेत.

*ह्या पुस्तकांचे विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत. बाकीची सर्व पुस्तके वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १ पत्यावर मिळतील.

विदर्भ साहित्य संघ

वार्षिक साधारण सभेची सूचना

घटना नियम १० प्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की, विदर्भ साहित्य संघाची वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक २४ एप्रिल १९६० रोजी दुपारी २ वाजता नागपूर येथे केंद्रीय कार्यालयात भरेल.

सभेपुढील विषयः—

(१) मागील सभेचा अहवाल
(२) गतवर्षीचे कार्यवृत्त
(३) गतवर्षीचे हिशेब
(४) १९६०-६१ चे अंदाजपत्रक
(५) १९६०-६१ करिता अधिकृत हिशेबतपासनीसांची नेमणूक
(६) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय

गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभेच्या वेळेनंतर त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरविण्यात येईल. सभेत मांडावयाचे ठराव किंवा सूचना लेखी स्वरूपात सभेपूर्वी चार दिवस अगोदर केन्द्रीय कार्यालयात पोहोचावयास पाहिजेत.

सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, अशी विनंती आहे.

दि. ३०-३-१९६०
वि. सा. संघ
नागपूर

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

नवीन सभासद होऊं इच्छिणारास सूचना

विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९६० पासून सुरू होत असून नवीन वर्षाकरिता सभासद नोंदणी सुरू झाली आहे. वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठीभाषीप्रेमी व्यक्तीला सभासद होता येते. नव्याने सभासद होणारांना आवेदनपत्र भरून द्यावे लागते. साधारण सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त रु. तीन आहे. सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यात येतात. सभासदांचे वर्ग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **उपकर्ते**—पाच हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(आ) **आश्रयदाते**—एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(इ) **सहाय्यक**—पाचशे किंवा अधिक रुपये देणारे.

(ई) **हितचिंतक**—अडीचशे किंवा अधिक रुपये देणारे.

(उ) **आजीव सभासद**—पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.

(ऊ) **साधारण सभासद**—वार्षिक तीन रुपये देणारे.

मराठी भाषेबद्दल प्रेम असणाऱ्या जास्तीत जास्त व्यक्तींनी सभासद व्हावे. आवेदनपत्र व वर्गणी केंद्रीय कार्यालयाकडे किंवा अधिकृत कार्यकर्त्याकडे जमा करावी व पावती घ्यावी ही विनंती.

सर्व जुन्या सभासदांकडे एप्रिल महिन्याचा युगवाणीचा अंक पाठविण्यात आला आहे. परंतु एप्रिल अखेरपर्यंत सभासदाची वर्गणी कार्यालयात जमा न झाल्यास किंवा युगवाणी चालू ठेवण्याबद्दल कार्यालयास न कळविल्यास प्रथेप्रमाणे मे महिन्यापासून अंक पाठविण्यात येणार नाही. तरी जुन्या सभासदांनी त्वरित कार्यालयात वर्गणी पाठवावी किंवा " किंवा वर्गणी कालांतराने पाठविण्यात येईल; युगवाणी बंद करू नये " असे तरी निदान कार्यालयात अवश्य कळवावे, ही विनंती.

श्री. गो काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

हें मासिक श्री. **पुरुषोत्तम दिवाकर ढवळे**, यांनी वि. सा. संघाकरिता नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका